म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा.वा.
दा. क्र. ४५२०

# छपाल हिम

BVBK-0404520

पु. रा. बेहेरे.

# त्रपति
# वाजी

प्रं. मं. ठाणे

८०८



मुद्रक : ज. दि. देसाई
राष्ट्रवैभव प्रेस
गिरगांव : मुंबई ४

प्रकाशक : ग. का. रायकर
झावबाची वाडी
मुंबई नंबर २

प्रथमावृत्ति : शिवजयंती
१५ मे १९५३
अक्षय्य तृतिया

चित्रकार : शं. तु. माळी
आर्. के. बिल्डिंग
न्यू भायखळा मुंबई

मुद्रा : गुप्ता ब्रदर्स
चमारबाग पोस्ट लेन
परळ मुंबई १२

चित्रछपाई : प्रकाश आर्ट प्रिंटर्स
व्हिक्टोरिया मिल कंपाउंड
गांवदेवी : मुंबई ७

# आशीर्वाद !

श्री. **पु. रा. बेहेरे** ह्यांनीं लिहिलेलें हें श्रीशिवाजी महाराजांचें चरित्र आहे. ह्या चरित्राचा आकार लहान आहे. विषयाची मांडणी सरळ व स्पष्ट आहे. त्याची भाषा सोपी, ओघवती व आकर्षक आहे. हें चरित्र सामान्य वाचकांकरितां लिहिलें आहे. विशेषतः मुलांना तें अधिक उपयुक्त व्हावें अशी त्याची मांडणी आहे. परंतु एवढ्यानें ह्या पुस्तकाचें स्वरूप स्पष्ट होत नाहीं किंवा त्याचें खरें मोल ठरत नाहीं. ह्या चरित्रांत शिवाजी महाराजांनीं आपल्या महाराष्ट्राच्या उद्धारासाठीं व्यतीत केलेल्या जीवनाची रूपरेषा मांडली आहे व ती मांडतांना तत्कालीन प्रसंगांच्या वर्णनांनीं परिपूर्ण असलेल्या बखरवाङ्मयाचा आधार व त्यांतील अवतरणें तर घेतलीं आहेतच परंतु तत्कालीन ऐतिहासिक साधनांचीहि दखल घेतली आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं तत्कालीन भाषा वापरल्यानें त्या त्या प्रसंगांना तत्कालीन वातावरणाच्या वलयाचें अवगुंठण प्राप्त झालें आहे. ह्या छोटेखानी पुस्तकांतील चरित्रनायक ऐतिहासिक प्रभावी व्यक्ति, ऐतिहासिक प्रसंग, भाषाहि ऐतिहासिक असल्यामुळें तें वाचतांना आपण ते प्रसंग, प्रत्यक्ष पाहात आहोंत कीं काय असा भास होतो. त्यांत आधारभूत अस्सल साधनांचा भरपूर उपयोग केल्यामुळें पुस्तक अस्सलहि झालें आहे व लौकिकहि झालें आहे, असें ह्या पुस्तकाचें द्विविध स्वरूप आहे.

महाराष्ट्राचा उज्ज्वल इतिहास, महाराष्ट्राचा आदर्श पुरुष स्वातंत्र्यनिर्माता, हिंदवी स्वराज्याचा संस्थापक इत्यादि दृष्टीनें श्री शिवाजी महाराजांचें गुणवर्णन मराठी भाषेंत व वाङ्मयांत जितकें व्हावयास पाहिजे तितकें अद्याप झालें नाहीं असें म्हणावें लागतें. तत्कालीन ऐतिहासिक साधनांच्या झालेल्या संशोधनाच्या दृष्टीनेंहि मराठी भाषेंतील ही उणीव जाणवते. मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचें संशोधन महाराष्ट्रांत गेल्या चाळीस पन्नास वर्षांत इतकें झालें आहे कीं त्याबद्दल महाराष्ट्राला अभिमान वाटावा. शिवकालिन इतिहासाचीं साधनेंहि कांहीं कमी उपलब्ध झालीं नाहींत. इतकें असूनहि त्या सर्व साधनांचा संपूर्ण परामर्श घेतलेला व मराठ्यानें लिहिलेला प्रमाणभूत असा मराठ्यांचा इतिहास अद्याप लिहिला गेला नाहीं. राजवाडे, खरे, पारसनीस, आपटे, पोतदार, पुरंदरे, खरे, शंकरराव जोशी वगैरे मंडळींचे प्रयत्न साधनोपलब्धीच्या

‘ श्रीरामवरदायिनी ’

**भवानीमातेच्या चरणीं**

तिच्याच अनन्य भक्ताचें

हें चरित्र—पुष्प अर्पण असो !

## ऋण—निर्देश !

‘ इतिहास लिहायचा म्हणजे बऱ्याच गोष्टी वगळाव्या लागतात आणि संक्षिप्त इतिहासांत तर खूपच वगळावें लागतें,’ असे उद्‌गार एका इंग्रजी विद्वानानें काढले आहेत. प्रस्तुत चरित्र लिहितांना या उद्‌गारांची मला एकसारखी आठवण होत होती. पुस्तकाला पृष्ठांची मर्यादा असते. आणि ती ओलांडतां येत नाहीं.

या पुस्तकांतील गुणांचें श्रेय अर्थातच शिवचरित्राचें संशोधन करण्यासाठीं खपलेल्या विद्वानांकडे आहे. दोषांची जबाबदारी मात्र खास माझी आहे.

नव्या क्षेत्रांत शिरतांना श्रेष्ठांचे आशीर्वाद असले म्हणजे मनाला तितकाच धीर येतो. महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विद्वद्वर्य श्री. **नानासाहेब कुळकर्णी** यांनीं आपल्या जन्मजात सौजन्यानें आपल्या आशीर्वादांचा लाभ मला दिला. त्यांचा मी ऋणी आहे.

श्री. **ग. का. रायकर** यांनीं पुस्तक लिहिण्यास मला उद्युक्त केलें आणि त्यांनीं तें प्रकाशांत आणण्याचें ठरविलें म्हणूनच माझ्याकडून लिहून झालें इतकें सांगितलें कीं पुरे.

—**पु. रा. बेहेरे**



# सिंहगर्जना

राना भों चमेली और बेला सब राजा भये,
ठौर ठौर रस लेत नित यह काज है।
सिगर अमीर आनि कुंद होत घर घर,
भ्रमत भ्रमर जैसे फूल की समाज है॥

भूषन भनत सिवराज बीर,
तैंहि देस देसनमें राखी सब
दच्छिन की लाज है।

त्यागे सदा षट्पद—पद अनुमानि
यह अलि नवरंगजेब चंपा सिवराज है।

छत्रपति शिवाजी महाराज गंभीर झाले होते. त्यांच्या शेजारीं त्यांचे फारसीनवीस नील प्रभू लेखणी सरसावून बसले होते. महाराज बोलूं लागले आणि फारसी खलिता तयार होऊं लागला.

खलिता फारच महत्त्वाचा होता. दिल्लीपती औरंगजेबाला उद्देशून तो लिहिला जात होता. आणि महाराजांच्या ध्येयवादाला आव्हान करणाऱ्या त्याच्या कृत्याला उत्तर म्हणून तो पाठविला जात होता.

आपल्या राज्यांतील सर्व हिंदूंवर जिझिया कर बसविल्याचें फर्मान औरंगजेब बादशहानें काढलें होतें. काशीविश्वेश्वराचें मंदिरहि त्यानें पाडून टाकलें होतें.

औरंगजेबाच्या दरबारांत मोठमोठे रजपूत सरदार होते. पण त्यांना औरंगजेबाला जाब विचारण्याचें धैर्य नव्हतें. सगळ्या हिंदुस्थानांत शिवछत्रपतिशिवाय हें धाडस कोणालाच झालें नसतें.

छत्रपति शिवाजी दक्षिण-दिग्विजय करून परत आल्यावर त्यांना हें औरंगजेबाचें कृत्य समजलें तेव्हां स्वतःचें सारें चरित्र त्यांच्या नजरेसमोर आलें. सारा धैर्यवाद उचंबळून आला. आणि त्यांनीं खलिता सांगण्यास सुरवात केली.

आग्र्याहून उड्डाण करून आल्यानंतरच्या आपल्या कामगिरीनें औरंगजेबाची पंचाईत झाली हें लक्षांत आणून त्यांनीं सांगितलें, " सांप्रत आम्ही इकडे निघून आल्यावर माझ्याशीं युद्ध चालविण्यांत पातशाही खजिना रिकामा जाहला व सारें द्रव्य खर्च जाहलें, याजकरितां हिंदु लोकांपासून जझिया पट्टीनें द्रव्य उत्पन्न करून पातशाहीचा क्रम चालविला आहे ऐसें ऐकण्यांत आलें. "

आपले पुष्कळ किल्ले आणि आपला प्रदेश आपल्या हातांतून गमावला. बाकी राहिलेलाहि लवकरच गमावेल; कारण त्यांची नासधूस आणि धूळधाण करण्यासाठीं मी शक्य तितके प्रयत्न नेटानें करणारच आहे.

सुवर्णालंकारांनीं नटलेली सुंदर तरुणी ज्याच्या राज्यांतून एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत निर्धास्त जाऊं शकेल त्याला असले कर कदाचित् बसवितां येतील; पण आपल्या राज्यांत शेतकऱ्यांची पायमल्ली झाली, मुलुख उध्वस्त झाला, दिवसाढवळ्या मोठमोठीं शहरें लुटलीं जातात.

'सारांश शिपाई लोक हैराण, व सौदागर पुकारा करितात व मुसलमान रडतात व हिंदु जळतात. आणि कित्येक लोकांस पोटास मिळत नाहीं असें आहे. तेव्हां राज्य चालविणें कसें ?'

'बादशहा व बादशहाजादे यांचे घरीं दारिद्र्याचा वास जाहला. तेव्हां पदरचे मनसबदार व उमराव यांची अवस्था कळतच आहे.'

हिंदुस्थानच्या कायद्याचें या करानें उल्लंघन होत आहे. ईश्वर हा एकंदर सर्व मानव जातीचा आहे, केवळ मुसलमानांचा नाहीं. मशिदींत नामघोष करून ज्याची प्रार्थना करतां त्याच परमेश्वराची देवालयांत घंटा वाजवून पूजा होते. 'त्यास कोणाचे धर्मास विरोध करणें हें आपले धर्मापासून सुटणें व ईश्वराचें लिहिलें रद्द करून त्याजवर दोष ठेवणें आहे.'

हा कर गोरगरीबांवर बसविण्यांत पुरुषार्थ काय? ते अनाथ मुंग्या चिलटांसारखे. 'याजवर हिंदु लोकांस पीडा करण्यांतच धर्म आहे असें मनामध्यें आलें असल्यास आधीं राजा राजसिंग यांजपासून जिझिया घ्यावा. म्हणजे इकडून कठीण नाहीं.' (म्हणजे मग माझ्याकडे मागून पहा.)

'पातशाही पुरातन हिंदूंची आहे...पेशजी सुलतान महंमद गुजराथी हा असा गैरचालीनें वागला तो लवकरच बुडाला...अन्तःकरण पातकानें मलीन जालें तें स्वच्छ करावें ही चांगली सल्ला आहे.'

जिझिया कर लादण्याची सल्ला देणारे लोक किती मूर्ख आहेत हें सांगतांना शेवटीं महाराज म्हणतात, 'पदरची मंडळीहि पाहतां पाहतां अग्नि तृणानें झांकितात याचें आश्चर्य वाटतें!'

या पत्रानें औरंगजेब जिझिया कर रद्द करणार नव्हता हें महाराजांना माहीत होतें. पण उन्मत्त हत्तीचा मस्त रव कानीं पडतांच गर्जना करणें हा सिंहाचा स्वभावच आहे.



★

१५०४

## चारशें वर्षांपूर्वी

चारशें वर्षांपूर्वी महाराष्ट्राची स्थिति विसंवादी होती. शेतकरी कष्ट करून पिकवीत होते, पण ते नाडले जात होते. हिंदूंची ही पुरातन भूमी, पण तेथेंच ते गुलाम झाले होते. वृत्तीनें धार्मिक, पण त्यांच्या धर्माचाच उच्छेद होत होता. त्यांच्या अंगीं पराक्रम होता, पण क्षुद्र स्वार्थासाठीं, किंवा वैरें उगवण्यासाठीं त्याची माती होत होती; त्याला पुंडाईचें स्वरूप आलें होतें. साधुसंतांचे समाजाच्या उद्धारासाठीं प्रयत्न चालले असूनहि या समाजाची विद्या आणि कला गंजत होती. एकादा पराक्रमानें मान्यतेला चढलाच तर त्याला मुसलमान राज्यकर्त्यांची सेवा करून त्यांचींच धोरणें यशस्वी करावीं लागत.

'कित्येक दावल मलकास जाती। कित्येक पीरास भजती
कित्येक तुरुक होती। आपुले इच्छेनें' असें झालें होतें.

उत्तर भारतांत मुसलमानी राजसत्ता नांदत होती. दक्षिणेंतील विजयनगरचें हिंदुराज्य केव्हांच उध्वस्त झालें होतें. बहामनी राज्याचे पांच तुकडे झाले होते. त्यांपैकीं अहमदनगर, विजापूर, गोवळकोंडें, येथील तीन बादशाह्या कांहींशा बलिष्ठ होत्या. हिंदूंच्या धर्मावर आणि संस्कृतीवर या राजसत्तांचें कमी-अधिक आक्रमण होत होतें. सबंध हिंदुस्थानांत हिंदूंची सत्ता नामशेष झाली होती. याचा परिणाम असा झाला होता, कीं सिंहाला आपल्या स्वभावाची विस्मृति व्हावी त्याप्रमाणें हिंदूंना आपण सत्ताधारी होऊं शकूं याची जाणीवच नष्ट झाली होती. त्यामुळें त्यांच्या अंगीं असलेला पराक्रमहि त्यांना बंधनकारक होत होता.

" स्वतंत्र राज्य निर्माण करण्याचा पुढाकार फक्त मुसलमानांचा असा एक नियमच त्या काळांत होऊन बसला होता. हिंदु मनानें

किती कमकुवत झाले होते, याचीं उदाहरणें कितीतरी आहेत. एखाद्या बंडखोर हिंदु राजाचा मुसलमानांनीं क्रूरपणें मोड केला, त्या राजाच्या संततीला सक्तीनें बाटविलें, त्याच्या कुटुंबांतील बायकांना आपल्या जनानखान्यांत कोंडून बेअब्रूचीं कामें करावयास लाविलें, तर अशा अत्याचारांची खंत वाटूं न देतां त्या राजाच्या अधिकाराचा वारसा मागायला त्याचे हिंदु नातलग कचरत नसत. हिंदु राज्यकर्ते स्वार्था-पायीं इतक्या मानसिक हीनावस्थेस पोंचल्याचा अनुभव जर मुसल-मानांना येत होता तर हिंदूंच्या धार्मिक मनोगताची प्रतिष्ठा मुसलमानांनीं कां बाळगावी ?"

अशी परिस्थिति होती. पण या मुसलमानी सत्तांची आपसांत स्पर्धा होती. निजामशाही आणि आदिलशाही यांचे राज्यविस्तारासाठीं आपसांत झगडे चालत. त्याचप्रमाणें दिल्लीची मोंगल बादशाही दक्षिणेंतील या पातशाह्या बुडवून तेथें आपला एकछत्री अंमल बसविण्यास आतुर असे. या त्यांच्या संघर्षामध्यें मदतीसाठीं ते मराठी सरदारांवर अवलंबून असत. पराक्रम गाजवून नांव काढण्याची संधि मराठा सरदारांना यामुळेंच मिळत असे. या काळांत जाधव, जेधे, घोरपडे, भोंसले असे अनेक सरदार पुढें आले. पण या परिस्थितीचा फायदा घेऊन स्वराज्य निर्माण करतां येईल ही कल्पना कांहींशा अंधुकपणें फक्त राजे शहाजी भोंसले यांनाच होती.

★

## इत साहजी है । उत साहजहाँ

दक्षिणेंत मुसलमानी बादशाह्या असतांनाहि शहाजी ही मोठी शक्ति होऊन राहिली होती. त्याच्या पदरीं सात आठ भाषा बोलणारे पाऊणशें कवि आणि पंडित होते. यावरून त्याची स्वतःची विद्वत्ता दिसून

येतेच, पण दक्षिणेंत विद्या आणि कला यांना तो केवढा आश्रय देत होता हेंहि समजतें. दक्षिणेच्या राजकारणांत त्यानें जें असामान्य स्थान मिळविलें होतें त्यामुळेंच त्याला हें शक्य झालें. त्यामुळें सहाजिकच 'अरु उत्तर दच्छिन रच्छनकों। इत साहजी है, उत साहजहाँ ॥' अशी कवीनें त्याची उत्तरेंतील शहाजहान बादशहाशीं तुलना केली.

चितोडच्या सिसोदे या राजपुत घराण्यांतील दोन पुरुष नशीब काढण्यासाठीं चौदाव्या शतकाच्या सुरवातीला दक्षिणेंत आले ते शहाजीराजांचे पूर्वज. कधीं शिपाईगिरी, कधीं शेती अशातऱ्हेनें हें घराणें आपला कालक्रम करीत असे. शहाजी राजांचे वडील मालोजी यांनीं आपल्या पराक्रमानें शिपाईगिरींत नांव काढलें. फलटणचे सरदार निंबाळकर यांच्या बहिणीशीं मालोजीचें लग्न झालें होतें. या उभयतांचे पोटीं शहाशरिफ या साधू पुरुषाच्या आशीर्वादानें १५९४ सालीं शहाजी राजाचा जन्म झाला. शहाजी राजे दिसण्यांत सुस्वरूप, वागण्यांत चपल आणि बुद्धीनें तीक्ष्ण होते. त्यांचें लग्न लखुजी जाधवराव या निजामशहाच्या मनसबदाराची मुलगी जिजाबाई हिच्याशीं झालें. निजामशाहींत आपल्या पराक्रमाच्या जोरावर शहाजीराजांचें वजन वाढूं लागलें. निजामशाही नष्ट करण्यासाठीं मोंगलांचे प्रयत्न चालू असल्यामुळें पराक्रमाला अवसर होता.



: शहाजी भोंसले :


पण शहाजीचें हें वाढतें प्रस्थ निजामशहाचा वजीर मलिकंबर याच्या डोळ्यांत खुपूं लागलें. मलिकंबर आणि शहाजी यांचें पटेना. शेवटीं १६२५ सालीं शहाजीराजांनीं आदिलशाहींत प्रवेश केला.

लगेच आदिलशहानें पुण्याजवळच्या मावळ सरहद्दीवर ताबा बसविण्यास त्यांस पाठविलें. पुणें व सुपें हे प्रांत, शिवनेरी व चाकण हे किल्ले शहाजीराजांच्या लग्नाच्या वेळींच निजामशाहींतून भोंसल्यांना मिळाले होते. विजापूरच्या नोकरींत राहून या जहागिरीची देखरेखहि शहाजी करीत होतेच. पुढच्या वर्षीं मलिकंबर मृत्यू पावला. त्यामुळें निजामशाहींतील त्यांचा प्रतिस्पर्धि नाहींसा झाला. पण ते आपण होऊन निजामशाहींत परत आले नाहींत. १६२८ मध्यें खुद्द निजामशहा मुर्तिजानें त्यांना आग्रहानें परत नेलें. पण विजापूरकरांनीं त्यांच्या जहागिरीवर धाड घालून पुणें उध्वस्त केलें. विजापूरकरांना सामिल करून घेऊन मोंगल बादशाही निजामशाहीचा एकेक भाग जिंकीत होती. इकडे निजामशहानें विश्वासघात करून शहाजीराजांचा सासरा जाधवराव यांचा खून केला. यामुळें त्यांचें मन विटून ते १६३० मध्यें मोंगलांना मिळाले. पण मोंगलांनीं तसाच विश्वासघात चालविलेला पहातांच ते १६३२ सालीं परत निजामशाहींत आले.

यावेळीं मोंगलांनीं आपली सर्व शक्ति निजामशाहीवर केंद्रित केली होती. त्यांनीं दौलताबादेचा किल्ला जिंकून निजामशहास पकडून कैदेंत ठेवलें. एका अर्थानें निजामशाही खलास झाली. (१६३३) पण ही खलास झालेली निजामशाही पुढें तीन वर्षे शहाजी राजांनीं केवळ आपल्या बळावर मोंगलाविरुद्ध लढविली. त्यांनीं पेमगिरीच्या किल्ल्यांत निजामशहाचा एक नातलग गादीवर बसविला. परंतु विजापूरकरांनीं मोंगलांशीं हातमिळवणी केली आणि शहाजी राजांची कोंडी झाली. सर्व तऱ्हेचे इलाज हरल्यावर त्यांनीं मोठ्या नाइलाजानें १६३६ मध्यें निजामशाहीचें विसर्जन केलें आणि ते कायमचे विजापूरकरांच्या नोकरींत गेले. आदिलशहानें त्यांना कर्नाटकच्या कामगिरीवर पाठविलें. ती कामगिरी त्यांनीं आनंदानें स्वीकारली. पण


त्याचवेळीं इकडे आपली पुण्यांतील जाहागिरी परत मिळविली. तेथें दादाजी कोंडदेव याला कारभारी नेमून जिजाबाई आणि शिवाजी यांची व्यवस्था केली.

शहाजीराजांनीं संभाजी मोहित्याची वहीण तुकाबाई हिच्याशीं दुसरें लग्न केलें होतें व त्यांना एकोजी नांवाचा मुलगाहि झाला होता. या दुसऱ्या बायकोवर शहाजी राजांचें विशेष प्रेम असल्यामुळें जिजावाईची वेगळी सोय करणें आवश्यक होतें. म्हणून त्यांची सोय पुण्याच्या जहागिरींत करण्यांत आली. शिवाय आतांपर्यंतच्या लढ्यांत शहाजीला आपली कर्तबगारी प्रतीत झाली होती. पण मुसलमानी सत्तेशीं उघड संघर्ष करण्याची त्यांची तयारी नव्हती. म्हणून त्यांनीं विजापुरी बादशाहीपासून दूर कर्नाटकांत आपला संसार थाटण्यास सुरवात केली. घरांतील सावत्रपणाचे वाद विकोपाला न जाण्याच्या दृष्टीनें त्याचा फायदा झाला आणि पुण्याच्या जहागिरींत शिवाजी महाराजांना स्वतंत्रपणें आपले उद्योग करण्यास मोकळीक मिळाली.




: तुकाबाई :

★



# बाल शिवाजी

लग्न झाल्यापासून शहाजीराजांचा काळ धामधुमीचा गेला. त्यांतून खुद्द सासऱ्याच्या कुटुंबाशींच त्यांचा विरोध आलेला. त्यामुळें जिजाबाईला संसारसुख असें फारसें मिळालेंच नाहीं. तिचा वडील मुलगा संभाजी शहाजीराजांबरोबर असे. जिजाबाईला या किल्ल्या-वरून त्या किल्ल्यावर अशी आपल्या नवऱ्याबरोबर धांवपळ करावी लागे. अशा स्थितींत ती गरोदर राहिली. तेव्हां शहाजी राजांनीं तिला शिवनेरी किल्ल्यावर बंदोबस्तानें ठेवलें. तेथेंच १९ फेब्रुवारी १६३० रोजीं शिवाजीराजांचा जन्म झाला. याच काळांत शहाजी-राजांनीं तुकाबाईशीं लग्न केलें. त्यामुळें जिजाबाईचें त्यांच्याशीं पुढें फारसें रहस्य राहिलें नाहीं.



: शिवनेरी :

या लग्नामुळें जिजाबाई शहाजीराजांपासून मनानें दुरावली; घोड्यावर मांड ठोकून शहाजी मोंगलाशीं लढत असल्यामुळें या

काळांत शरीरानेंहि दुरावलीच होती. नवऱ्याचें माहेरच्या माणसांशीं वैर आलेलें आणि खुद्द पिता लखुजी जाधवराव याचा खून झालेला, अशा स्थितींत ही मानी स्त्री निराधार झाल्यासारखी होती. त्यामुळें तिचा जीव सर्वस्वी शिवाजीवर जडणें अगदीं साहजिक होतें. पण तेथेंहि संकटांनीं तिची पाठ सोडलेली नव्हती.

शिवाजी तीन वर्षांचा असतांना ती जुन्नरच्या किल्ल्यावर रहात होती. या वेळीं शहाजीनें निजामशाहीच्या रक्षणासाठीं विजापूरकरांना अनुकूल करून घेऊन मोंगलांना चेपीत आणलें होतें. यामुळें मोंगलांचा दक्षिणेंतील सेनापति महाबतखान याचा तिळपापड झाला. शहाजीला शह देण्यासाठीं त्यानें वेगळाच डाव टाकला. जुन्नरच्या किल्ल्यावरून जिजाबाई आणि शिवाजी यांना पकडून आणलें तर शहाजीला पेंचांत धरतां येईल असें त्याला वाटलें. पण हें कामहि शक्तीच्या जोरावर होण्यासारखें नव्हतें. म्हणून महाबतखानानें त्रिंबकचा किल्लेदार म्हाल-दारखान याच्यावर विश्वासघात करण्याची ही कामगिरी सोंपविली.


म्हालदारखान हा शहाजी आणि जिजाबाई यांच्या परिचयांतला होता. जिजाबाईची भेट घेण्याच्या मिषानें तिची परवानगी घेऊन तो जुन्नरच्या किल्ल्यावर आला. किल्ल्यावर प्रवेश होतांच त्यानें आपलें स्वरूप प्रगट केलें आणि जिजाबाईला अटक केली. पण शिवाजी मात्र त्याच्या हातीं लागला नाहीं. विश्वासघातकी राज-कारणाचा अनुभव जिजाबाई पंचवीस वर्षे घेत होती. म्हालदारखान येणार हें कळतांच शिवाजीला तिनें गुप्तपणें शिवापूरला रवाना करून दिलें होतें. एकटी जिजाबाई हातीं आल्यामुळें महाबतखानहि खट्टू झाला.

जिजाबाईचा चुलता जगदेवराव जाधव मोंगलांकडे होता. त्याला तिच्या अटकेची वार्ता समजतांच त्यानें महाबतखानाला कळविलें

कीं, शहाजीचें जिजाबाईशीं पटत नाहीं म्हणून त्यानें दुसरें लग्न केलें आहे. तेव्हां जिजाबाईच्या अटकेनें शहाजीवर कांहीं परिणाम होणार नाहीं; उलट आमचा मात्र अपमान होतो. महावतखानाला हें पटल्यामुळें त्यानें जिजाबाईची सुटका केली.

जिजाबाईच्या जीवनांतील ही अस्थिरता, शहाजीराजांचा निजाम-शाहीसाठीं लढा चालू असेपर्यंत कायम होती. १६३६ सालीं शहाजीराजे विजापूरकरांकडे दाखल होऊन कर्नाटकच्या स्वारीवर निघाले तेव्हां तिची व शिवाजीची व्यवस्था पुण्याच्या जहागिरींत करण्यांत आली. आणि त्या भागांत तिचाच कारभार सुरू झाला.

★



# तीन रंगांचीं तीन चित्रें

जिजाबाई शिवाजीसह पुण्यांत राहूं लागली त्यावेळीं शिवाजी सहा वर्षांचा होता. त्याच्या शिक्षणाकडे लक्ष देणें आतां आवश्यक होतें. स्वत: जिजाबाई हें काम करीत होतीच, पण शहाजी राजांनीं पुण्याच्या जहागिरीवर नेमिलेला कारभारी दादोजी कोंडदेव यानेंहि त्याकडे आस्थेनें लक्ष दिलें.

दादोजी कोंडदेव हा शहाजीराजांच्या विश्वासांतला होता. तो चतुर मुत्सद्दी आणि करडा कारभारी होता. शहाजीनें बांधलेले वाडे

जाळून, पाडून मधल्या धामधुमींत विजापुरकरांच्या मुरार जगदेवानें पुण्यावरून गाढवाचा नांगर फिरवला होता, तेथें सोन्याचा नांगर दादोजीनें फिरविला. कसब्यांत रंगमहाल नांवाचा वाडा शिवाजीसाठीं बांधून त्याचा इतमाम वाढविला.



: दादोजी कोंडदेव :

पण हा इतमाम पोषाखी नव्हता. दंग्याधोप्यांनीं उजाड झालेल्या या भागांत दादोजीनें शेतीला आणि वसाहतीला उत्तेजन दिलें. चोर लांडग्यांचा बंदोबस्त केला. फळांचे बाग लावले. सगळ्या जहागिरीला मध्यवर्ति अशा कोंडाण्याच्या खालीं शिवापूर हें शिवाजीच्या नांवानें गांव वसविलें.

जहागिरीची अशी उत्तम व्यवस्था करीत असतांनाच शिवाजीला, राजपुत्राला योग्य असें शिक्षण त्यानें दिलें. जिजाबाईनें शिवाजीच्या मनावर धार्मिक संस्कार केले. रामायण-महाभारताचें श्रवण हा तिचा नित्याचा कार्यक्रम. हिंदूंची अवनति आणि मुसलमानी सत्तेचे दुष्परिणाम ती स्वतःच भोगीत होती. त्यामुळें महाभारत रामायणांतील आदर्श तिच्या मनावर तीव्रतेनें ठसले होते आणि तेच तिनें शिवाजीच्या



: राजमाता जिजाबाई :

बालमनावर अहर्निश बिंबविण्याचा प्रयत्न केला. अशा तऱ्हेनें स्वतंत्र

वातावरणांत स्वातंत्र्यप्रिय शिक्षण घेत शिवाजी मोठा होत होता. १६४० च्या सुमारास दादोजीनें निंबाळकरांची मुलगी सईबाई हिच्याशीं शिवाजीचें लग्न केलें. आणि शहाजी राजांची भेट घेण्यासाठीं जिजाबाई व शिवाजी यांना घेऊन तो बंगलोरास गेला.

विजापूरच्या आदिलशहातर्फे शहाजीराजांनीं १६३७ ते १६४० पर्यंत कर्नाटकांत तीन स्वाऱ्या करून तेथील हिंदू नायकांना आदिलशाहीच्या अंकीत केलें. पण आदिलशाहाचा धर्म-द्वेष इतका प्रबल होता कीं त्यानें त्या नायकांचा उच्छेद करविला, हिंदूंना बाटविलें आणि मंदिरें पाडलीं. अर्थात् ही गोष्ट शहाजीराजांच्या मनाला लागली. पण एका अर्थानें ते अगतिक होते. कर्नाटकांत कारभारी म्हणून त्यांची नेमणूक १६४० सालीं झाली तेव्हां त्यांनीं ही परिस्थिति बदलली. तेथील हिंदू नायकांशीं संबंध जोडले. आणि विजापूरच्याच अंमलाखालीं पण हिंदूंचें असें वेगळें राज्यच त्यांनीं निर्माण केलें. शहाजी राजे पराक्रमी होते तसेच रसिक आणि रंगेलहि असल्यामुळें बंगलोरांत हिंदू राज्याचा दरबारी थाटहि निर्माण झाला असल्यास नवल नाहीं.

पुण्याच्या जहागिरींत शिवाजी ज्या वातावरणांत वाढला त्याला पूरक असेंच वातावरण बंगलोरला त्याला पहायला सांपडलें. दादोजीनें शिवाजीचें शिक्षण चांगलें पुरें केल्याबद्दल शहाजीराजांनीं खूप होऊन दादोजीचा गौरव केला. बंगलोरला शिवाजी दोन वर्षे होता. या काळांत शहाजीच्याच हाताखालीं कारभाराचें शिक्षण त्याला मिळालें असेल. हिंदूंचें राज्य स्थापण्याची इच्छा, पण त्यासाठीं बंड करण्याइतक्या आत्मविश्वासाचा अभाव अशा चमत्कारिक मनःस्थितींत शहाजीराजे या काळांत होते. त्याचाहि परिणाम शिवाजीवर झाला असेल.

पुढें शिवाजीला घेऊन शहाजीराजे विजापुरास गेले. विजापूरला त्यांनीं शिवाजीला बादशहाच्या भेटीस नेलें. पुणें आणि बंगलोर

यांच्या अगदींच उलट वातावरण विजापुरांत होतें. आणि तें शिवाजीला मानवण्यासारखें नव्हतें. त्यामुळें जिजाबाईसह शिवाजीची रवानगी पुन्हा पुण्याला करण्यांत आली.

बंगलोर-विजापूरच्या भेटींत शहाजीराजाला आपल्या पुत्राच्या स्वभावाची ओळख झाली. त्याला उत्तेजन देण्यासाठीं शामराज नीलकंठ, सोनोपंत डबीर, बाळकृष्णपंत मुजुमदार वगैरे विश्वासाची मंडळी त्याच्याबरोबर पाठविली. कान्होजी जेधे वगैरे शहाजीराजांच्या पदरची मंडळीहि शिवाजीच्या पुढच्या उद्योगांत सामील झाली. यावरून शिवाजीच्या कार्याला शहाजीचा विरोध नसावा, मनोमन आशीर्वादच असावा असें दिसतें.

★

## राज्य व्हावें ही श्रीची इच्छा

मराठा तितुका मेळवावा । आपला महाराष्ट्र–धर्म वाढवावा ॥
ये विषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ॥

विजापुराहून परत आल्यावर शिवाजी महाराजांच्या कार्यास जोरानें चालना मिळाली. तानाजी मालुसरे, येसाजी कंक, बाजी पासलकर अशी तरुण मंडळी महाराजांनीं आपल्याभोंवतीं गोळा केली. आपल्या विचारांनीं जोडीदारांना भारून टाकण्याची जादुगिरी महाराजांकडे होतीच. पण त्यांनीं वडील मंडळीवरहि मोहिनी घातली. कान्होजी जेधे, गोमाजी नाईक असे वृद्ध देखील त्यांच्या शब्दाबाहेर जाईनात.

आपल्याला जहागिरींतील सगळा मुलुख, डोंगर, दऱ्या, गडकोट, चोरवाटा आपल्या जोडीदारांसह त्यांनीं पायांखालीं घातल्या. याच वेळीं मावळ भागांतील निरनिराळ्या देशमुखांच्या भेटी गांठी घेऊन

त्यांना आपला वेध लावण्याचें काम त्यांनीं सुरू ठेवलेंच होतें. दादोजी कोंडदेव जहागिरीचा कारभार करीत होते. त्यांत लक्ष घालून कारभारांतहि त्यांनीं पारंगतता मिळविली.

पुणें व सुपें या मुळच्या जहागिरींत बारामती, इंदापूर, मावळ यांचा समावेश या पूर्वींच झाला होता. कोंडाणा उर्फ सिंहगड हें या प्रदेशाचें नाक होतें. हें नाक हस्तगत झाल्याशिवाय आपल्या राज्याला खरी सुरक्षितता येणार नाहीं हें शिवाजी आणि दादोजी यांच्या लक्षांत आलें. १६४४ मध्येंच त्यांनीं कोंडाणा हस्तगत केला. याची दखल आदिलशाही दरबारानें तावडतोब घेतली. 'दुष्ट दादोजी आणि त्याचे हरामखोर साथीदार यांना नेस्तनाबूद' करण्यासाठीं खंडोजी व बाजी घोरपड्यांची नेमणूक करून त्यांना सामील होण्याबद्दल आदिलशहानें कान्होजी जेधे आदिकरून देशमुखांस फर्मानें लिहिलीं. पण ते देशमुख आधींच शिवाजी महाराजांना सामील झाले होते.

आपल्या कार्याचा ध्येयवाद जोडीदारांच्या आणि सामील करून घेतलेल्या देशमुखांच्या मनांत बिंबविण्यासाठीं विधियुक्त समारंभाची आवश्यकता होती. महाराजांनीं रोहिडेश्वर किल्ला काबीज करून तेथें रोहिडेश्वरासंनिध स्वराज्याच्या शपथा घेतल्या. कोन्होजी जेधे पुढें येऊन त्यानें जमलेल्या देशमुखांना उद्देशून सांगितलें, 'मुसलमान बेइमान आहे. कार्य जालियावरी नस्ते निमित्य ठेवून नाश करील हे मऱ्हाष्ट राज्य आहे अवघियानी हिम्मत धरून जमाव घेऊन राजश्री स्वामी संनिध राहोन येकनिष्ठेने शेवा करावी.' या वडिलधाऱ्या माणसाचा एवढा पाठिंबा मिळाल्यावर तरुणांचा उत्साह किती उचंबळला असेल याची सहज कल्पना करतां येईल.

आदिलशाही अधिकाऱ्यांना या प्रकाराची कुणकुण लागलीच. त्यांनीं आपल्या देशमुखांना दमदाटी करण्यास सुरवात केली.



: महाराजांनीं रोहिडेश्वराच्या संनिध स्वराज्याच्या शपथा घेतल्या :

' शिवाजी राजे यानें शहाशीं बेमानगी करून मावळे लोकांचा जमाव केला. रोहिडा किल्ल्यावरील ठाणें उठवून आपण किल्ल्यांत शिरला. हल्लीं राजगड किल्ला नांव करून बळकावला....हुकूम पोंचतांच अमीनाशीं रुजू होणें. नाहींतर शहा तुला विजापुरीं नेऊन गर्दन मारतील ' असले खलितें शहानें देशमुखांना पाठविले.

पण देशमुखांनीं हे खलितें शिवाजी महाराजांकडे पोंचविले. शिवाजी महाराजांनीं देशमुखांना धीर दिला आणि सांगितलें कीं, ' तुम्ही व आम्ही आदिलशहाशीं बेमानगिरी बिलकूल करीत नाहीं. रोहिडेश्वरानें आम्हास यश दिलें आणि पुढेंहि तोच तुमचे आमचे हिंदवी स्वराज्याचे मनोरथ पुरे करण्यास समर्थ आहे. श्रीचे संनिध दादोजीपंताचे विद्यमानें तुमचें आमचें इमान झालें तें वज्रप्राय कायम आहे. हें राज्य व्हावें अशी श्रीचीच इच्छा दिसते. तुम्ही बिलकूल हवालदील होऊं नये. ' इतकें आश्वासन मिळाल्यावर एकदां महाराजांना मिळालेले देशमुख आदिलशहाला पुन्हा सामील झाले नाहीं तर तें नवल नव्हे.

त्यानंतर महाराजांनीं तोरणा किल्ल्याच्या किल्लेदारांशीं संधान बांधून तो किल्ला आपल्या ताब्यांत आणला. त्याची डागडुगी करून त्याला प्रचंडगड नांव ठेवलें आणि आपली शिबंदी त्यावर ठेवून दिली. आपल्या कार्याला परमेश्वराचें साह्य आहे अशी भावना महाराजांनीं निर्माण केली होतीच. तोरण्यावर त्यांना द्रव्य भांडार सांपडतांच ती अधिक दृढ झाली. या द्रव्यानें त्यांनीं मोरोपंत पिंगळे यांच्याकडून राजगड किल्ला बांधविला.

असें असलें तरी सगळे देशमुख सहजासहजीं महाराजांना अनुकूल होणें शक्य नव्हतें. एक तर त्यांना स्वार्थापलिकडे कांहीं दिसत नव्हतें. महाराजांचा ध्येयवाद आकलन करण्याची त्यांची पात्रता

नव्हती. मावळांत देशमुखांची एकमेकांवर शिरजोरी चालत असे त्यापैकींच हा प्रकार आहे असें त्यांना वाटे. अर्थात् अशा देशमुखांवर दंड–भेदाचाहि प्रयोग महाराजांना करावा लागला. क्रमाक्रमानें हें काम पार पाडून त्यांनीं ‘ बारा मावळें काबीज केलीं, मावळे देशमुख बांधून दस्त करून पुंड होते त्यांस मारिलें. ’

★

## पुरंदरावर दिपवाळी

जहागिरीचें स्वरूप पालटत होतें. तिची वाढ होत होती, तिच्यांतील प्रजा सुखी आणि समृद्ध होत होती. तसेंच स्वराज्याच्या ध्येयवादानें तिच्यामध्यें एक नवी निष्ठा निर्माण झाली होती. शिवराजानें आपली नवी मुद्रा यावेळीं प्रचलित केली.

प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।


शहाजीराजांचे पुत्र शिवराज यांची ही मुद्रा प्रतिपदेच्या चंद्रकले-प्रमाणें तेजस्वी असून उत्तरोत्तर ती वाढत जाऊन विश्ववंद्य होणारी आहे. शिवराजाच्या तेजस्वी आत्मविश्वासाचें ही मुद्रा म्हणजे एक प्रतीकच आहे.

महाराजांचा लोक–संग्रह चालूच होता. ‘ कारकून सरदार वगैरे येतील ते मसलतींत घेऊन आणखी चांगले मर्द शिपाई पाहून त्यांस जवळ ठेवावें. कारकून चांगला कर्ता लिहिणार पाहून त्यास ठेवावा. तसेंच राजकारणें करावीं; मातबर चहूं जागचे मराठे यांसी आप्तपणा करावा; पत्रें लिहावीं; त्यांस आणून भेट द्यावी, आपण त्यांजकडे आम्हांस अनुकूल असावें असें बोलावें. ’ अशा तऱ्हेनें हें काम चालू होतें.

याच वेळीं महाराजांनीं चार प्रधानांची नेमणूक केली. शहाजीराजांनीं विजापुराहून येतांना जीं माणसें बरोबर दिलीं होतीं त्यांतून ही निवड झाली. देशमुखांना वळवून घेणाऱ्या मुत्सद्दी सोनोपंताला डबीर, ज्या शामराज नीलकंठानें त्यांना दस्त केलें त्याला पेशवा, सैन्याची व्यवस्था ठेवणारा रघुनाथ बल्लाळ कोरडे यास सबनीस, आणि हिशेब ठेवणारे बाळकृष्णपंत हणमंते यास अमात्य असे हुद्दे महाराजांनीं दिले.

'कृष्णाजी नाईक बांदल देशमुख जोरावारीनें मावळांत वसूल' घेत होते. त्यांचा बंदोबस्त दादोजी कोंडदेव यांनीं केला. त्यानंतर चाकणचें ठाणें. तेथें फिरंगोजी नरसाळा हवालदार होता. त्याला वश करून घेऊन आपल्या वतीनें महाराजांनीं त्यालाच त्या ठाण्यावर कायम केलें. १६४७ सालीं दादोजी कोंडदेव मृत्यु पावले.

राज्याला बळकटी येण्यासाठीं पुरंदर किल्ला आपल्या ताब्यांत असणें महाराजांना आवश्यक वाटत होतें. पण 'निळो निलकंठराव नाईकवाडी किले पुरंधर निजामशाही किला बळकावून भोंवता मुलूख मारून खंडणी घेऊन होते.'



: पुरंदर :

त्यांच्याशीं उघड सामना करणें कठीण होतें. कारण किल्ला बळकट. तेव्हां महाराजांनीं दुसरी युक्ति योजली.

त्यांनीं किल्लेदारास पत्र पाठविलें कीं, 'दादो कोंडदेव आम्हांजवळ वडिलीं ठेवून दिले होते ते मृत्यु पावले. आतां आम्ही निराश्रित जालों. तुमचे आमचे वडिलांचा बहुत घरोबा, स्नेह यास्तव किल्ल्या आश्रानें खालीं माची जवळ येऊन राहूं.' किल्लेदारानें मान्यता देतांच पंचवीस हजार मावळे व पागा घेऊन महाराज गडाखालीं येऊन राहिले. निळो

निळकंठ यांनीं आपले धाकटे बंधु शंकराजी यांना शिवाजीराजे यांचेपाशीं दिमतीस ठेवलें.

महाराजांवर लक्ष ठेवण्यासाठींच किल्लेदारानें शंकराजीस त्यांच्याकडे ठेवलें असावें. पण तो महाराजांस सामील झाला. आमचे बंधु आम्हास वांटा देत नाहींत. तुम्ही माझा हिस्सा मिळवून द्या अशी त्यानें महाराजांना विनंति केली. महाराजांनीं त्याला तसें आश्वासन दिलें.

पुढें दिवाळीचा सण येतांच निळोजीनें आपल्या भावास सणासाठीं घरीं बोलावलें. त्यानें शिवाजी राजे व जिजाबाई यांना टाकून आपण कसें यावें असें सांगून पाठविलें. तेव्हां निळोजीनें त्या सर्वांना आमंत्रण देऊन आणण्यास सांगितलें. शंकराजीनें 'राजे व जिजाबाई, तसेंच मावळे व पागेचे बारगीर या सर्वांस गडावर नेलें. सन्मान करून तीन दिवस न्हाणें भोजनें करून राहविलें.'

शंकराजी, व निळोजीचा दुसरा भाऊ पिलोजी हे महाराजांस सामील होते. प्रतिपदेच्या रात्रीं निळोजी झोंपला असतां त्याच्या पायांत महाराजांच्या माणसांनीं बेड्या ठोकल्या. पिलाजी, शंकराजी यांनाहि कैद केलें. पुरंदर आपल्या ताब्यांत घेतल्यावर चौथे दिवशीं तिघाही बंधूंना सोडवून वस्त्रें दिलीं व पुरंदराखालीं ठेवलें. तुम्ही इमानानें वागाल तोंपर्यंत तुमच्याशीं इमान राहील अशी त्यांना आणभाक दिली.

महाराजांनीं १६४८ सालीं पुरंदर हस्तगत केल्यावर त्यांच्या पराक्रमाची दीप्ति विजापुरापर्यंत फांकली आणि तिकडेचे पांचसातशें पठाण महाराजांकडे नोकरी करण्यासाठीं आले. त्यांना आश्रय देण्याचा प्रथम महाराजांचा विचार नव्हता. पण 'ज्यास राज्य करणें त्यानें अठरा वर्ण, चाऱ्ही जाती यांस आपआपले धर्माप्रमाणें

चालवून त्यांचा संग्रह करून ठेवावें ' अशी सल्ला मिळाल्यावर त्यांना ठेवून घेतलें.

याच वेळीं महाराजांच्या धैर्याचा आणि पराक्रमाचा कस लावणारी दुसरीच एक घटना घडत होती.

★

## कांटीनें कांटी झाडावी

शहाजीराजे कर्नाटकांत जिंजीच्या लढाईवर होते. तेथें विजापूरकरांचा सेनापति मुस्ताफाखान याच्याशीं त्यांचा बेबनाव झाला. शहाजीराजांचें वजन मुस्ताफाखानाला नेहमींच दुःसह वाटत होतें. त्यांत या जिंजीच्या वेढ्यांत शहाजीराजांनीं ' माझी फौज थकली असल्यामुळें मी बंगलोरास परत जाऊन फौज ताजीतवानी करून परत येतों ' असें त्याला कळविलें व नकार मिळतांच परवानगीची वाट न पहातां मला निघून जाणें भाग आहे असा निरोप पाठविला. त्यापूर्वींच शहाजीराजे कुतुबशहाशीं संधान बांधीत असल्याचा सुगावा त्याला लागला होता. म्हणून मुस्तफाखानानें विजापूरहून गुपचूप हुकूम आणून शहाजीराजांना कैद करण्याचें ठरविलें.

अर्थात् दांडगाई करून शहाजीराजांना पकडण्यांत यश येण्याची त्याला खात्री नव्हती. त्यामुळें शहाजीराजे एका रात्रीं नाच गाणें ऐकून निद्रिस्त झाल्यावर मुस्ताफाखानानें पहांटे बाजी घोरपडे आणि काहीं मुसलमान सरदारांना त्यांच्यावर पाठविले. बाजी घोरपडे स्वतःला आदिलशहाचा एकनिष्ठ सेवक म्हणवीत असे आणि भोंसल्यांशीं त्याचे भाऊबंदकीचे वाद होतेच. त्यामुळें त्यानें या प्रकरणांत उत्साहानें भाग घेतला. शहाजीराजांना ते बिछान्यांत निद्रिस्त असतांनाच त्यानें पकडलें आणि त्यांची रवानगी विजापूरला

करण्यांत आली. घोरपड्याला त्याच्या या कर्माचें प्रायश्चित्त पुढें स्वतः महाराजांनीच दिलें.

कर्नाटकांतील हिंदूंचा शहाजीराजे घेत असलेला कैवार आणि बंगलोरांत त्यांनीं चालविलेले उद्योग विजापुरकरांच्या कडव्या मुसलमानी मनाला बोंचत होते. आणि शहाजी राजे आयते कैदी होऊन सांपडल्यावर त्यांच्याकरवीं शिवाजी महाराजांच्या वाढत्या उपद्रवाला आळा घालण्याचा बेत आदिलशहानें केला असला तर नवल नाहीं.

आगस्ट १६४८ मध्यें शहाजीराजांना पकडून आणतांच विजापुरी फौजा महाराजांवर मावळांत चालून गेल्या. त्यांना तोंड देण्यासाठीं महाराजांनीं संभाजी कावजीची त्यांच्यावर रवानगी केली. संभाजी कावजीनें त्या फौजेला मारून काढलें. तेव्हां ती फौज पुरंदर किल्ल्यावर खुद्द महाराजांवरच चालून गेली. पण गड चढूं लागतांच बंदुकांच्या गोळ्यांनीं आणि शिलांच्या वर्षावानें त्या फौजेचा महाराजांच्या सैन्यानें गडावरून संहार केला.

इकडे बंगलोरावर चालून गेलेल्या विजापूरकरांच्या फौजेचा, शिवाजी महाराजांचे वडील बंधू संभाजी यांनीं पराभव केला. पण केवळ शक्तीच्या जोरावर शहाजीराजांची सुटका होण्यासारखी नव्हती. म्हणून आदिलशहाला दुसरा शह देण्याची महाराजांनीं तयारी केली.

मोंगलांतर्फे दक्षिणेच्या सुभेदारीवर यावेळीं शहाजादा मुरादबक्ष होता. त्याच्याकडे महाराजांनीं संधान बांधलें. मोंगलांनीं निजामशाही बुडवून टाकलीच होती. आतां मोंगली सत्ता आदिलशाहीचा नाश करण्यास टपली होती. म्हणून दक्षिणेंतील पराक्रमी मराठे सरदार आपल्या बाजूला मिळाले तर ते त्यांना हवेच होते. शहाजीराजांची

सुटका झाली तर आपण मोंगलांना मिळण्यास तयार आहों, तसेंच खुद्द शहाजीराजेहि मोंगलांची सरदारी पत्करतील असें महाराजांनीं मुरादबक्षाला कळविलें.

वस्तुत: मोंगलांच्या बाजूला जाऊन आदिलशाही नामशेष करूं देण्यास महाराजांची तयारी नव्हती. फक्त शहाजीराजांच्या सुटकेसाठीं त्यांनीं टाकलेला तो एक डाव होता. मुरादबक्षानें 'तुमचा इतबारी वकील बोलणें करण्यास पाठवा' असें कळविलें तरी महाराज स्वस्थ होते. 'तुम्ही हुजूर यावें म्हणजे मनसब व इनाम दिल्या जाईल' असें त्यानें पुन्हा कळविलें तरी महाराजांनीं दखल घेतली नाहीं. अखेर त्यानें शहाजीराजांनाच कळविलें कीं, "तुमची मोकळीक करण्याविषयीं शिवाजीनें कळविलें आहे. तुमचा इतबारी वकील पाठवावा. तुम्हाकरितां पोषाख पाठविला आहे." याच वेळीं त्यानें महाराजांनाहि एक पत्र पुन्हा पाठविलें. या पत्रापत्रींत नऊ महिने गेले.

शहाजीराजांना मोंगल सुभेदाराकडून पत्र येतांच आदिलशहा वचकला. शिवाजी आणि संभाजी यांच्या पराक्रमानें तो आधीं नरमला होताच. शेवटीं त्यानें स्वत:चा आब राखण्यासाठीं दरबार भरवून शहाजी राजांची भेट घेतली. आणि 'कोंडाणा, बंगलोर व कंदापिली हीं ठिकाणें तुम्ही अजिबात सोडून शहाचे ताब्यांत द्यावीं, आणि इतउत्तर निष्ठेनें त्याची सेवा करावी' या अटीवर त्यांची मुक्तता करण्यास मान्यता दिली.

या अटीप्रमाणें शहाजीराजांनीं आपल्या मुलांस किल्ले सोडून देण्याबद्दल पत्रें लिहिलीं. संभाजीनें बंगलोर सोडलें नाहीं. महाराजहि कोंडाणा सोडण्यास राजी नव्हते. पण सोनोपंत डबीरानें युक्तिवाद करून त्यांना कोंडाणा सोडून देण्यास लावलें आणि अशारितीनें १६ मे १६४९ रोजीं शहाजीराजांची सुटका झाली.

★



# शिवाजीचें पितृप्रेम

वडिलांची सुटका झाल्यामुळें महाराजांची एक चिन्ता दूर झाली. या प्रकरणांत कोंडाणा त्यांना हातचा घालवावा लागला होता. पण त्यामुळें त्यांचा धीर खचला नाहीं. मावळांत त्यांना विरोध करणारे देशमुख अजून शिल्लक होते त्यांचा समाचार घेण्याचें काम त्यांनीं परत हातीं घेतलें.

पहिला मोर्चा त्यांनीं सुप्याचे संभाजी मोहिते यांच्यावर वळविला. आपली हुकमत मान्य करा असें त्याला गोडीगुलाबीनें सांगून पाहिलें. पण तो ऐकत नाहीं असें पहातांच महाराजांनीं मावळ्यांची एक टोळी बरोबर घेऊन एका मध्यरात्रीं मोहित्यावर छापा घातला. आणि मोहित्याला आणि त्याच्या लोकांना कैद केलें. तरीहि तो महाराजांचें म्हणणें कबूल करीना. तेव्हां त्याची पागा, खजिना ताब्यांत घेऊन त्याला शहाजीराजांकडे पाठवून दिलें. कारण संभाजी मोहिते हा महाराजांची सावत्र आई तुकाबाई हिचा भाऊ होता.

'प्रतिपच्चंद्ररेखेव' वाढत जाणाऱ्या महाराजांच्या पराक्रमाचे किरण कर्नाटकांत शहाजी राजांना आनंदवीत होते. आपल्याला जें साधलें नाहीं तें हा आपला प्रतापशाली पुत्र करून दाखवीत आहे यामुळें त्यांना धन्यता वाटली. त्यामुळेंच आपल्या जन्मभूमीचें दर्शन घ्यावें आणि शिवरायाचीहि भेट घ्यावी असा त्यांना वेध लागणें साहजिक होतें. त्याप्रमाणें ते शिवरायाची भेट घेण्यास महाराष्ट्रांत येण्यास निघाले.

'शहाजी राजे फौजेसह वर्तमान पुण्यासंनिध आले.' तब्बल बारा वर्षांनीं पिता–पुत्रांच्या भेटीचा योग आला होता. म्हणून शास्त्रा- प्रमाणें ती भेट देवळांत व्हावी असें ठरलें. शहाजीराजांचा मुक्काम बारामतीचे मैदानांत नीरेवर झाला होता. 'उभयपक्षीं जासूद हरकारे जाऊन येऊन आरडगांवचे पलिकडे भेटीचा नेम ठरविला. शिवाजी- राजे सामोरे भेटीस गेले. हत्तीवर महाराज देखतांच घोड्याखालीं उतरोन मुजरा करीत पुढें गेले. भेटी मोठ्या समारंभानें झाल्या. किल्लो किल्ल्यांस तोफांची सरवत्ती एकसमयावच्छेदें जाली. विधियुक्त शिवालयीं पूजा होऊन उभयतां भेटले. एक प्रहर आनंदाश्रू पूर लोटला.'

'नंतर शहाजी महाराज पालखींत बसून चालले. राजे पालखी समागमें पायीं पांच कोस पुण्यास गेले. जिजाऊची भेटी जाहली. प्रेमानें बोलणीं [illegible] भोजनें होऊन मनाची निर्मलता जाली. मोठा आनंद रायांना [illegible] रेस येऊन बैसले ते समयीं शिवाजीराजांनीं पादरक्षा गत्यंतर न[illegible] हिले. महाराजांनीं मागें फिरोन पाहून हातीं धरून ब[illegible]जा एक[illegible]लें. दोन मास समागम होता.'

[illegible]यांनीं [illegible]युष्यांतील हा एक अभिमानाचा प्रसंग होता. शि[illegible]नाथ व[illegible]ळांत आपण मुळच्या जहागिरींत भर घालून स्वरा[illegible] हणमं[illegible]ऋसा उभारीत आणला आहे हें शहाजीराजांस दाखा[illegible] पु[illegible] बेतांची त्यांच्याशीं चर्चा केली आणि त्यांची सल्लामसलतीब[illegible]तहि[illegible]ारली. शहाजीराजे कर्नाटकांत निघून गेल्यावर स्वतंत्र माव[illegible]ांत्याप्रमाणें सलणारा जावळीचा मोरे उपटून काढण्याच्या उ[illegible] मिस महाराज मोठ्या कसोशीनें लागले.

★

## पारघाटीं ज[illegible]न्माता

साताऱ्याच्या नजिक असलेल्या जावळीच्या खोऱ्यांत मोरे हें बडें प्रस्थ होतें. सतत आठ पिढ्या त्यांचा अंमल या भागावर होता.



: जिजाईच्या आयुष्यांतील हा एक अभिमानाचा प्रसंग होता :

त्यामुळें त्यांच्याकडे संपत्ति विपुल होती; तसेंच त्यांच्याजवळ हजार मावळ्यांचें खडें सैन्य होतें. मोऱ्यांचे पुरुष पराक्रमी असल्यामुळें चंद्रराव ही पदवीच त्यांना प्राप्त झाली होती. या मोऱ्यांना शिवरायाचा उद्योग पसंत नव्हता, मग त्याच्या अंकित होण्यास त्यांनीं नकार दिला असेल हें सांगण्याचें कारणच नाहीं.

महाराज आणि मोरे यांच्यामध्यें अशी ही धुसफुस चालू असतांना विजापुरकरांनीं वाई प्रांतांत १६४९ सालीं अफजलखानाची नेमणूक केली. तावडतोब यशवंतराव आणि हणमंतराव या दोन मोऱ्यांनीं अफजलखानाशीं सख्य जोडलें. इतकेंच नव्हे तर जे देशमुख यापूर्वींच शिवाजी महाराजांच्या अंकित झाले होते त्यांनाहि आपल्याकडे ओढण्याची खटपट सुरू केली. शिव-रायांना ही कल्पना येतांच मोऱ्यांचा समूळ उच्छेद केल्याशिवाय गत्यंतर नाहीं याबद्दल त्यांची खात्री झाली. त्यांनीं आपल्या देशमुखांच्या फौजा एकत्र करून संभाजी कावजीला जावळीवर रवाना केलें. पण मोऱ्यांनीं त्याचा पाडाव केला. तोंच संभाजी कावजीच्या मागोमाग रघुनाथ बल्लाळ आणखी फौज घेऊन जावळीवर चालून गेला. या युद्धांत हणमंतराव मोरे पडला आणि जावळी हस्तगत झाली.

तावडतोब महाराज जावळींत दाखल झाले आणि तेथील व्यवहाराची व्यवस्था त्यांनीं लावली. यशवंतराव मोरे रायगड धरून बसला होता. तो जिंकून महाराजांना तेथें राजधानी स्थापन करावयाची होती. त्यांनीं तावडतोब रायगडावर मोर्चे लावले. तीन महिने युद्ध केल्यावर यशवंतराव थकला. त्यानें तहाचीं बोलणी लावलीं. या तहाच्या निमित्तानें तो महाराजांच्या हातीं सांपडतांच त्यांनीं त्याची गर्दन मारली (१६५६) व त्याच्या मुलांस पुण्यास कैदेंत ठेवलें. पण त्यांची फितुरी दिसून आली तेव्हां त्यांचाहि शिरच्छेद करविला.



: शिवाजीमहाराजांनीं प्रतापगडावर श्रीभवानीची स्थापना केली :

मोऱ्यांचा निःपात करून जावळी ताब्यांत आणल्यामुळें सबंध मावळांत महाराजांची जरब बसली. त्यांचा राज्यविस्तार झाला, फौज एकदम दुप्पट झाली. स्वराज्याचा पाया मावळांत भक्कम झाला. अर्थात् यावेळींच त्यांनीं श्रीभवानीची स्थापना करावी हें सहाजिक होय.



: प्रतापगड :

पारघाटाचें नाकें आपल्या ताब्यांत रहाण्यासाठीं तेथें एक किल्ला बांधणें आवश्यक होतें. त्या डोंगरावर मोरोपंत पिंगळे यांच्या करवीं महाराजांनीं प्रतापगड बांधविला. आणि 'राजियानें गंडकी नदीस द्रव्य गाडियावरी घालून, गंडकी पाषाण आणून श्री भवानी सिद्ध करून, प्रतापगडावर देवीची स्थापना केली. नवसे यात्रा सर्वदा तुळजापूरच्या प्रमाणें तेथें चालती झाली.' महाराजांची कुलदेवता अशा रीतीनें खुद्द त्यांच्या स्वराज्यांत आली.

समर्थ म्हणतात :—

तुळजापुर ठाकेना । चालिली पश्चिमेकडे
पारघाटीं जगन्माता । सद्य येउनी राहिली
येकची मागणें आतां । द्यावें तें मजकारणें
तुझा तूं वाढवी राजा । सीघ्र आम्हाची देखतां

★

## रत्नाचा सन्मान

आतां एक हिरडसचा देशमुख शिरजोर राहिला होता. महाराजांनीं एका रात्रीं अचानक हल्ला चढवून त्याचा रोहिडा किल्ला काबीज केला. या लढाइत महाराजांना एका अमोल्य नररत्नाचा लाभ झाला. देशमुखाचा दिवाण बाजी प्रभू यानें शर्थीनें लढून महाराजांच्या सैन्याला हैराण केलें. त्याला महाराजांनीं मोठ्या सन्मानानें आपल्या पदरीं घेतलें.

मावळांत निर्वेध सत्ता स्थापन झाल्यावर महाराजांनीं बाहेर दृष्टि फेंकली. यावेळीं औरंगजेब दक्षिणेंत सुभेदार होता. अद्यापपर्यंत महाराजांनीं मोंगलांना दुखवलें नव्हतें. आतांपर्यंत मिळविलेल्या सत्तेला मोंगलांच्या संमतीचा पाठिंबा मिळविणें महाराजांना राजकीयदृष्ट्या आवश्यक वाटत होतें. पण महाराजांचे डाव औरंगजेब ओळखून होता. त्यानें उडवाउडवी चालविली तेव्हां त्याला इंगा दाखविण्याचें महाराजांनीं ठरविलें.

औरंगजेबाचें यावेळीं विजापुरकरांशीं युद्ध चाललें होतें. ही संधि साधून महाराजांनीं एकदम जुन्नरवर हल्ला चढविला. दोऱ्याच्या शिड्यांनीं तटावर चढून मराठ्यांनीं पहारेकरी कापून काढले. मोंगली मुलखांत धुमाकूळ घालून मराठे अहमदनगरपर्यंत चालून गेले. पण इतक्यांत मोंगलांचा विजापुरकरांशीं तह झाला तेव्हां मोंगलांशीं एकाकी लढण्यांत हंशील नाहीं हें ओळखून महाराजांनीं माघार घेतली आणि कोंकणांत आपला मोर्चा वळविला.

प्रथम त्यांनीं गुप्तपणें स्वतः कोंकण भागांत हिंडून त्याची माहिती करून घेतली. कल्याणचा सुभेदार मुल्ला महंमद खजिना घेऊन विजापुरला जात होता तो लुटून राजगडावर नेला. शामराज नीळकंठाच्या हाताखालीं सैन्य देऊन भिवंडीवर रवाना केलें. आबाजी सोनदेवानें कल्याण ताब्यांत घेतलें. आजुबाजूचे किल्लेहि मिळविले.

याचवेळीं मुल्ला महंमदाची सुंदर सून आबाजी सोनदेवाच्या हातीं सांपडली. ती त्यानें शिवाजी महाराजांना नजर करण्यासाठीं त्यांच्याकडे आणली. पण त्यानें महाराजांस ओळखलें नव्हतें. " महाराजांनीं उत्तर केलें कीं, ' जिजाऊ साहेबांचें स्वरूप असें सुंदर असतें तर आम्ही याप्रमाणेंच जालों असतों ' असें बोलोन तिजला कन्येप्रमाणें मोजून वस्त्रें अलंकार देऊन समागमें पांचशें स्वार दिले आणि विजापुरास पोंहोचविली."

उत्तर कोंकण ताब्यांत आल्यावर महाराजांनीं जंजिऱ्याच्या सिद्दीकडून तळें व घोसाळा हे किल्ले घेतले. दक्षिण कोंकणांत मजल मारली. सावंतवाडीकर भोंसले यावेळीं महाराजांचे मांडलिक झाले. पश्चिम समुद्र किनाऱ्यावर सुवर्णदुर्ग, खारेपाटण, विजयदुर्ग हे किल्ले ताब्यांत आणून महाराजांनीं स्वराज्याची सरहद्द समुद्राला भिडविली.

औरंगजेबाला महाराजांची सारखी धास्ती वाटत होती. दिल्लीचें सिंहासन बळकावण्यासाठीं उत्तरेंत जातांना त्यानें आदिलशहास लिहिलें, ' शिवाजी किल्ले बळकावून बसला आहे त्यास हुसकावून द्या. त्याच्या नोकरीची जरूर असेल तर त्याला नवीन जहागिरी कर्नाटकांत द्या, पण या डोंगरी मुलखांत त्याला ठेवूं नका. ' विजापूर दरबारला हें कळत नव्हतें असें नव्हे, पण शिवाजी महाराजांना अडवण्याचें सामर्थ्यच त्या दरबारांत नव्हतें. पण तरीहि दरबारनें एक प्रयत्न केला.

★

## अफझुलखान निघाला

शिवाजी महाराजांनीं कोंकणांत जे विजय संपादन केले त्यामुळें विजापूर दरबारचा संताप झाला होता. इतक्यांत १६५८ मध्यें औरंगजेब दिल्लीला निघून गेल्यामुळें आपल्या छातीवरची एक धोंड

दूर झाल्यासारखें विजापूरकरांना वाटलें आणि महाराजांचा पाडाव करण्याचा गंभीर विचार ते करूं लागले. पण महाराजांच्या पराक्रमानें दरबारांत प्रत्येकानें इतकी धास्ती घेतली होती कीं त्यांच्यावर चालून जाण्यास कोणीच पुढें येईना. अखेर अफझुलखानानें ही कामगिरी आपल्या अंगावर घेतली.

अफझुलखान हें दरबारांत एक बडें प्रस्थ होतें. दरबारांत एकंदरींत गोंधळच होता. तेव्हां आपलें महत्त्व वाढविण्यास अफझुलखान टपून बसला होता. त्यामुळें ही संधि त्यानें साधली. ‘ शिवाजी काय ? चढे घोडियानिशीं जिवंत कैद करून घेऊन येतों ’ असा पैजेचा विडा उचलून तो १६५९ मध्यें विजापूरहून निघाला.

शिवाजी महाराजांचें पारिपत्य करण्याची बढाई मारून खान निघाला खरा, पण मनांत तो चरकला होता. शिवाजीच्या हातून जिवंत परत येऊं असें त्याचें मन त्याला सांगत नव्हतें. म्हणून तो विजापुराहून अफजलपुरास गेला. आणि आपल्या त्रेसष्ट बायकांचा त्यानें कडेलोट करून प्राण घेतला ! अफजलपूरास या बायकांचीं त्रेसष्ट थडगीं आजहि आहेत.

हें क्रूर कर्म आटोपून खान महाराजांवर निघाला. ‘ तेव्हां अवघी फौज एकत्र होऊन औरस चौरस लष्कर उतरलें आणि पुढें तुळजापुरास आलें. तेथें येऊन मुकाम केला. श्रीभवानी कुलदेवता महाराजांची, तीस फोडून, जातियांत घालून, भरडून पीठ केलें. पुढें लष्कर कूच करून श्रीपंढरीस आलें.’

असे उपद्व्याप करीत खान येत असल्याचें समजतांच महाराज पुण्याहून प्रतापगडावर आले. त्या अवघड डोंगराळ भागांत खानाची हड्डी नरम करणें सोपें आहे हें लक्षांत घेऊन रणनीतीचा पहिला पेंच महाराजांनीं टाकला. पण तो अफझुलखानाच्या लक्षांत आला नाहीं. त्यानें प्रतापगडाकडे मोर्चा वळवला आणि वाईला तळ दिला.

वाईला आल्यावर मावळांतील देशमुखांना फोडून आपल्या बाजूस वळविण्याचें काम त्यानें हातीं घेतलें. आणि 'राजियाकडे हेजिबास पाठवून, सल्ला करून, पातेजून जिवंत हातीं धरावा' अशीहि युक्ति त्यानें योजिली. त्याप्रमाणें वाईचा कुळकर्णी कृष्णाजी भास्कर याला महाराजांकडे रवाना केला.

अफझुलखान हें स्वराज्यावर एक प्राणसंकट आलें होतें. त्याचा पराक्रम आणि क्रूरपणा सर्वांना ठाऊक होता. विजापूरहून निघाल्या-पासून त्याच्या हालचालींनीं भीतीचें वातावरण सर्वत्र पसरलें होतें. कर्नाटकांत असतांना कस्तुरीरंग नाईकाला भेटीस बोलावून त्यानें विश्वासघातानें ठार केलें होतें. तेव्हां खानाचा वकील आल्याबरोबर पुढें काय करावें हा महाराजांना पेंच पडला.

कृष्णाजी भास्कराला त्याच्या ब्राह्मण जातीची आठवण देऊन स्वराज्याला साह्यकारी होण्याची महाराजांनीं विनंति केली. महाराजांचा मंत्र लागू पडला. खानाच्या दुष्ट हेतूची त्यानें परिस्फुटता केली. खानाच्या तळावरील खडान् खडा बातम्या महाराजांचे हेर आणीत होतेच. त्यांनीं पुढची योजना ठरविली आणि खानाला निरोप दिला कीं, 'एवढ्या सैन्याशीं सामना देण्याची माझी ताकद नाहीं. अपराध पोटीं घालाल तर मुलूख सोडून देतों.'

महाराजांचा वकील पंताजी गोपीनाथ यानें हा निरोप देतांच खानाला बरें वाटलें. या डोंगराळ मुलखांत लढाई किती कठीण आहे याची त्याला कल्पना होती. शिवाजी आयता हातीं सांपडल्यास फारच उत्तम असें त्यानें ठरविलें. महाराज फार घाबरले आहेत. त्यांना एकदां विश्वास पटला तर ते खानांबरोबर वाटेल तिकडे येतील, अशी भाषा वापरून पंताजीनें खानाचे गैरसमज पक्के केले. आणि महाराजांच्या आज्ञेप्रमाणें प्रतापगडाखालीं भेटीची जागा नक्की केली.

लगेच महाराजांनीं खानाच्या सरबराईस सुरवात केली. वाईपासून

प्रतापगडापर्यंत झाडें झुडपें तोडून रस्ता साफ केला. जागजागीं खानाच्या सैन्याच्या खाण्यापिण्याची सोय केली. खान सैन्यासह तेथें येऊन उतरला. महाराजांनीं गडाच्या पायथ्याशीं भेटीसाठीं मंडप तयार केला. 'ही जागा अशा ठिकाणीं होती कीं, गडावरून तेथें चाललेला तमाशा सर्वांस सहज दिसावा. गडाच्या तटावरील तोफांच्या भोंकांतून ही सदरेची जागा व अफजुलखानाच्या लष्कराचा गोट अगदीं स्पष्ट दिसतात.'

अफजुलखानाच्या भेटीचा विचार नक्की झाला तरी आपण हें साहस करीत आहोंत असें महाराजांना सारखें वाटत होतें. विश्वासघातकी खान कधीं दगाफटका करील याचा नियम नव्हता. तेव्हां प्रसंग पडला तर खानाचें सर्व सैन्य गारद करण्याची व्यवस्था त्यांनीं केली. आपले मावळे लोक गुप्तरितीनें डोंगरांत व झाडींत पसरून ठेवले आणि नेताजी पालकर आणि मोरोपंत पिंगळे यांना त्यांच्यावर नेमलें.

★



# प्रतापगडाखालीं थोर कीर्ति

भेटीचा दिवस उगवला. महाराजांनीं अंगांत चिलखत, त्यावर अंगरखा, डोकीस शिरस्त्राण, त्यावर पागोटें, उजव्या हातांत भवानी तलवार, बाहींत विचवा, डाव्या हातांत वाघनखें, अशी स्वसंरक्षणाची

जय्यत सिद्धता केली. सर्व कारभारी लोकांस जिजाबाईसंनिध बोलावून, 'आम्ही ही होड आरंभिली. श्री सिद्धीस नेईलच. कदाचित् वांकडेंहि पडल्यास तुम्ही घावरे न होतां शत्रूस बुडवावें, राज्य रक्षावें' अशी निरवानिरव केली. श्री भवानी मातेला वंदन केलें, जिजाबाई मातोश्रीचा आशीर्वाद घेतला आणि महाराज गडाखालीं निघाले.

महाराजांनीं बरोबर फक्त दोनच मर्द गडी घेतले होते. जिऊ महाला आणि संभाजी कावजी. एक पट्टा, एक फिरंग व ढाल असे ते हत्यार-वंद होते. 'वरकड आसपास धारकरी लोक जागीं जागीं जाळींत उभे केले'. होतेच.

महाराज गडावरून खालीं उतरूं लागले. इकडे "गोटांतून भेटीस यावयास खानहि सिद्ध होऊन चालिले. बराबरि लष्कर हजार दीड हजार बदुखी मुस्तेद होऊन चालिले. मोठे मोठे धारकरी लोक, समागमें निघाले. इतक्यांत पंताजी पंत पुढें होऊन अर्ज केला कीं 'इतका जमाव घेऊन गेलियानें राजा धाशत खाईल. माघारा गडावरी जाईल. भेटी होणार नाहीं. शिवाजी म्हणजे काय? त्यास इतका सामान काय करावा? राजा



: अफझुलखान :

दोघां माणसांनिशीं तिकडोन येईल. तुम्ही इकडोन दोघां माणसांनिशीं चलावें. दोघे बैसोन भेटावें. तेथें तजवीज करणें ते करा.' असें सांगितल्यावरी अवघा जमाव दूर बाणाचे टपियावरी उभे राहून खासा खान, एक पालखी, दोघे हुदेकरी व कृष्णाजीपंत हेजीब असे पुढें




: महाराजांनीं डाव्या हाताचीं वाघनखें खानाच्या पोटांत खुपसून त्याचीं आंतडीं बाहेर काढलीं :

चालिले. सैदबंडा म्हणोन पटाईत एक लष्करी समागमें घेतला. पंताजीपंतहि बराबरी आहेत असे सदरेत गेले. '

खान मंडपांत बसला. महाराजांना बोलावण्यास जासूद गेला. महाराजांनीं ' समाचार घेतां सैदबंडा मोठा धारकरी आहे हें ऐकून उभे राहिले. आणि पंताजीपंतास बोलावूं पाठविलें. ते आले. त्यास ( महाराज ) म्हणूं लागले जे, ' जैसे ( शहाजी ) महाराज तैसे खान. आपण खानाचा भतिजा ( भाचा ) होय. सैदबंडा खानाजवळ आहे त्याकरितां शंका वाटते. हा सैदबंडा इतका यांतून दूर पाठविणें. " या युक्तीनें सैदबंडाला दूर केल्यावर महाराज मंडपाजवळ आले.

खान उभा राहून महाराजांना सामोरा गेला. ' राजियानें भेटी देतां खानानें राजियाची मुंडी कवटाळून खांकेखालें धरिली. आणि हातींची जमदाड होती तिचें मेण टाकून कुशीस राजियाचे चालविली.' अंगांत चिलखत असल्यानें महाराजांना कांहींच इजा झाली नाहीं. पण खानाचा दुष्ट हेतू उघड झाला. महाराज तयारच होते. त्यांनीं डाव्या हाताचीं वाघनखें खानाच्या पोटांत खुपसून त्याचीं आंतडीं बाहेर काढलीं. तेवढ्यांत ' दगा दगा ' अशी आरोळी ठोकीत खानानें महाराजांच्या डोक्यावर दुसरा वार केला. पण शिरस्त्राणामुळें तोहि लागला नाहीं. महाराजांनीं भवानी तलवार उचलून खानाच्या खांद्यावर जबरदस्त वार केला.

खानाची आरोळी ऐकून सैदबंडा धांवत आला. आणि महाराजांवर तुटून पडला. महाराजांवर तो पट्ट्याचा वार करणार इतक्यांत जिवा महाल्यानें त्याचा हात तोडला आणि त्याला ठार केलें. पालखीच्या भोयांनीं खानाला पालखींत घालून चालविलें होतें. पण संभाजी कावजीनें भराभर भोयांचे पाय तोडले, आणि खानाचें शिर कापून किल्ल्यावर नेलें. महाराज गडावर आले. आणि विजयाची तोफ झडली.

ही इशारत मिळतांच मावळे सैन्य बाहेर पडलें आणि त्यानें एकदम खानाच्या फौजेस घेरलें. एका बाजूनें नेताजी पालकर, दुसऱ्या बाजूनें मोरोपंत पिंगळे यांनीं सैन्याचा सप्पा उडविण्यास सुरवात केली. खानाचें सैन्य आधीं बेसावध होतें आणि खुद्द खानाचा शिरच्छेद झाल्याचें समजतांच त्यांचें असलें–नसलेलें अवसानहि गळून गेलें. या लढाईत ९५ हत्ती, चार हजार घोडे उंट, ७० तोफा शिवाय सामान, जडजवाहीर वगैरे दहा लाखांची मत्ता महाराजांस मिळाली.

फौजेचा मोड केल्यावर जे लोक खुषीनें राहिले त्यांना महाराजांनीं पदरीं ठेवून घेतलें. ज्यांची तशी इच्छा नव्हती त्यांना सन्मानानें विजापुरास रवाना केलें. पण खंडूजी खोपडे देशमुख खानाला सामील होता. त्यानें खानाचा मुलगा फाजल याला आडवाटेनें सुरक्षित रवाना केल्याचें कळतांच महाराजांनीं खोपड्याला पकडून आणून त्याचा शिरच्छेद केला.

अफजलखानाच्या वधानें महाराजांची थोर कीर्ति झाली. त्यांचें साहस आणि शौर्य, मुत्सद्देगिरी आणि रणनीति यांचें तेज सर्वत्र पसरलें. जिजाबाईनीं अज्ञानदास शाहीराला बोलावून पोवाडा तयार करविला. व त्याला सोन्याचा तोडा व एक घोडा बक्षिस दिला. ज्यांनीं ज्यांनीं पराक्रम केले त्यांना वस्त्रें-भूषणें देऊन महाराजांनीं गौरविलें. ‘ पुणें, इंदापूर, चाकण, सुपें, बारामती ऐसे इनाम हिंदु व मुसलमान यांसी आहेत, त्यास पेशजी आपणास मुकासा असतां, अफझलखाना आधीं जेणें प्रमाणें ज्यास जें पावत असेल त्यास तेणें प्रमाणें देणें ’ अशीहि व्यवस्था महाराजांनीं केली.

★

## पन्हाळ्यावरचें साहस

अफजलखानाचा निःपात केल्यावर महाराज विजापुरकरांवर मोहिम करण्यास बाहेर पडले. पन्हाळा ही विजापूरकरांची पश्चिम राजधानी. तेथील हिंदु किल्लेदाराशीं संधान बांधून महाराजांनीं तो ताब्यांत आणला. पावनगड, वसंतगड, रांगणा आणि विशाळगड हे किल्लेहि एका मागून एक शर्थीनें लढून घेतले. आदिलशहानें रुस्तुमिजमान आणि फाजलखान यांना महाराजांवर पाठविलें. पण त्यांचा मोड करून महाराजांचें सैन्य विजापुरपर्यंत मुलूख मारीत गेलें आणि खंडणी गोळा करीत वायुवेगानें परत आलें. महाराजांच्या हालचाली इतक्या त्वरेनें होत होत्या कीं त्यांचा पाठलाग करणें अशक्य होतें.



फाझलखान

अखेर आदिलशहानें सिद्दी जौहार या सरदाराच्या हाताखालीं दहा हजार स्वार आणि चौदा हजार पायदळ असें प्रचंड सैन्य देऊन त्याला महाराजांवर पाठविलें. बाजी घोरपडे, फाजलखान, रुस्तुमिजमान हेहि त्याला येऊन मिळाले. या स्वारीला तोंड देण्यासाठीं नेताजी पालकर, मोरोपंत पिंगळे, वगैरे आपले सेनापति जय्यत तयार ठेवून स्वतः महाराज पन्हाळ्यावर येऊन राहिले.

जोहारानें पन्हाळ्याला वेढा दिला. नेताजी वगैरे सरदारांना वेढा सैल करणें शक्य झालें नाहीं. इकडे मोंगल सुभेदार शाहिस्तेखान दक्षिणेंत अधिकारावर आला होता, त्यानेंहि महाराजांविरुद्ध हालचाली सुरू केल्या. पावसाळ्यांत वेढा ढिला होईल ही अटकळहि खोटी ठरली. तेव्हां कांहीं करून आपण प्रथम वेढ्याच्या बाहेर पडलें पाहिजे असें महाराजांनीं ठरविलें.

‘ शरण येऊन तह करतों ’ असें बोलणें त्यांनीं जोहाराशीं सुरू केलें. पण या हुलकावणीचा उलटा परिणाम झाला. जोहारानें वेढा सक्त केला. तेव्हां महाराजांनीं निकरानें बोलणें लावलें कीं, ‘ किल्ला खालीं करून देतों; अभयवचन असेल तर स्वत: किल्ल्याखालीं येऊन स्वाधीन होतों. ’ या हुलकावणीचा रामबाण लागू पडला. आणभाक झाली. महाराजांचें साहस अफाट. ते स्वत: किल्ल्याखालीं आले. जोहाराशीं बोलणीं झालीं. दुसऱ्या दिवशीं किल्ला जोहाराचा स्वाधीन करण्याचें ठरलें आणि ते पुन्हा किल्ल्यावर गेले.

इतकें झाल्यावर जोहाराच्या सैन्याला वाटलें कीं पन्हाळा आपल्या हातीं आलाच. सहाजिकच वेढयांत ढिलाई झाली. इकडे महाराजांचा दुसरा साहसी बेत ठरला होता. निवडक एक हजार मावळे बरोबर घेऊन ते निघाले. अंधारांतून चौक्या पहारे चुकवीत त्यानीं वेढा पार केला आणि तडक विशाळगडाची वाट धरली.

पण महाराज निसटले ही कुणकुण कांहीं वेळानें जोहाराला लागली. लगेच त्यानें चौकशी केली. आणि आपला जावई सिद्दी मसूद आणि त्यानंतर फाजलखान यांना महाराजांचा पाठलाग करण्यास पाठविलें. सकाळीं महाराज विशाळगडाचा घाट चढत असतांना या सैन्यानें त्यांना पाहिलें.

महाराजांनीहि शत्रू मागें येत आहे हें पाहिलें. या शत्रुसैन्याला रोखलें नाहीं तर गडावर निर्धास्त जाणें कठीण हें ओळखून महाराजांनीं पावनखिंडींत बाजी प्रभूच्या हाताखालीं मावळे दिले. 'किल्ल्यावर पोंचल्याच्या तोफा ऐकूं येईपर्यंत शत्रूस अडवावा' अशी आज्ञा देऊन महाराज निघाले.


इकडे सिद्दीचे घोडेस्वार खिंड चालूं लागतांच बाजीच्या फौजेनें त्यांच्यावर हल्ला चढविला. तुंबळ लढाई होत होती. सिद्दीचे घोडेस्वार पडले तरी मागून नवे येतच होते. बाजीचे लोक धारातीर्थी पडून कमी कमी होत होते. दुपार झाली. फाजलचें सैन्य आलें. लढाई निकराला आली. बाजीला गोळी लागली. पण त्याचे प्राण जाईनात. गडावरील तोफांच्या आवाजासाठीं ते घुटमळूं लागले. इतक्यांत महाराज गडावर पोंचले आणि तोफा डागल्या गेल्या. 'या उपर जीव गेला तरी कांहीं धोका नाहीं' असे उद्‌गार काढून बाजीनें देहत्याग केला. पावनखिंड पावन झाली. (जुलै १६६०)


: बाजी प्रभू :

★

# इंग्रजांचा सूड

महाराज निसटून गेले तरी पन्हाळा लढविला जातच होता. आदिलशहा मोठी फौज घेऊन स्वतः मिरजेस आला. तीन महिने किल्ला लढविल्यावर, किल्ला खालीं करून देण्यास महाराजांनीं किल्लेदारास कळविलें. कारण पुण्यांत बसून उपद्व्याप करणाऱ्या शाहिस्तेखानाला त्यांना वठणीवर आणायचें होतें. शिवाय पन्हाळगडावरून त्यांनीं केलेल्या उड्डाणामुळें विजापूरकरांची पुरेशी बेअब्रू झाली होतीच.



: पन्हाळा :

इकडे शाहिस्तेखानानें महाराजांच्या चाकण किल्ल्यावर सैन्य पाठवून तो हस्तगत केला खरा, पण किल्लेदार फिरंगोजी नरसाळा यानें शौर्याची कमाल केली. या लढ्यांत त्यानें खानाचे २६८ लोक गारद केले. ६०० जखमी केले. यामुळें खानाला हबका बसला. त्यानें

किल्ल्यांचा नाद सोडला व महाराजांच्या ताब्यांतील उत्तर कोंकणाकडे दृष्टि वळवली.

उत्तर कोंकणांत प्रचंड सैन्य उतरविण्याचें निश्चित करून करतल्बखानाच्या हाताखालीं हें सैन्य, तोफा वगैरे सरंजाम देऊन त्याला रवाना केलें. वाशीमच्या उदारामाची विधवा पंडिता रायबागीण ही सुद्धां आपल्या सैन्यानिशीं त्याच्या बरोबर निघाली. लोहगडाखालच्या उंबराखिंडींतून हें सैन्य कोंकणांत उतरणार हें हेरून महाराजांनीं आपले बेत नक्की केले.

खिंडी भोंवतालच्या डोंगरांत महाराजांनीं आपलें सैन्य गुप्तपणें बसवून ठेवलें. करतल्बखान आवाक्यांत येतांच या सैन्यानें त्याला घेरलें. वाटा अरुंद, करतल्बखानाचें सामानसुमान अवजड, प्रदेश अनोळखी. त्यामुळें त्यांचा फडशा पाडणें सोपें होतें. शेवटीं करतल्बखान शरण आला. तेव्हां त्याचें सामान लुटून आणि त्याच्याकडून दंड घेऊन महाराजांनीं त्याला सोडून दिलें. रायबागीणीचा मात्र वस्त्रें देऊन सत्कार केला. तेव्हां 'मी तुमची धर्मकन्या म्हणवीती' असे उद्गार तिच्या तोंडून बाहेर पडले.

करतल्बखानाची दाणादाण उडविल्यावर महाराजांनीं आपलें लक्ष पुन्हा आदिलशहाकडे वळविलें. नेताजी पालकराला मोंगलांवर लक्ष ठेवण्यास सांगून त्यांनीं स्वतः विजापुरकरांच्या ताब्यांत असलेल्या दक्षिण कोंकणावर चाल केली. त्यांच्या हालचाली वाऱ्यासारख्या होत असत. त्यांनीं दंडा–राजपुरीपासून खारेपाटणपर्यंत मुलूख एका दमांत सर केला. 'तळ कोंकण महाराजांस अर्जानी झालें.'

पण महाराजांना इंग्रजांचाहि सूड घ्यायचा होता. राजापूरच्या इंग्रजांनीं पन्हाळगडाच्या वेढ्यांत जोहाराला दारुगोळा पुरविला होता, आणि ऐटीनें आपला बावटा दाखवून पन्हाळ्यावर गोळे टाकविले

होते. म्हणून त्यांनीं राजापूर जिंकलें आणि इंग्रजांना भेटीस बोलावून त्यांना एकदम कैद केलें. महाराजांनीं २४ हजार होन लूट मिळविली. हे सात इंग्रज पुढें दोन वर्षें कैदेंत होते. त्यांपैकीं दोन कैदेंतच मेले !

★

## मध्यरात्रीं गनिम कोठें !

महाराजांनीं दक्षिण कोंकण जिंकलें तोंच इकडे शाहिस्तेखानानें कल्याण आणि त्याच्या आजुबाजूचा मुलूख आपल्या ताब्यांत आणला. शिवाय पुण्याला खुद्द महाराजांच्या लालमहालांत तळ देऊन तो पुणें आणि सातारा जिल्ह्यांतून महाराजांना रेंटण्याचे प्रयत्न करीत होता. तेव्हां त्याचा समाचार घेण्याशिवाय गत्यंतर नव्हतें.

पण समाचार घ्यायचा कसा ? येथेंहि शक्ति कामीं येणारी नव्हती. झुंजून फायदा नव्हता. तेव्हां महाराजांनीं कल्पकतेची आणि धाडसाची आणखी एक चमक दाखविण्याचें ठरविलें.

महाराज सिंहगडावर येऊन राहिले. हें कळतांच खानानें पुण्यांतील बंदोवस्त आणखी कडक केला. तेव्हां महाराजांनीं दोन ब्राह्मण शहरांत पाठवून तेथील व्यवस्थेची खडान् खडा बातमी आणली. आणि एका सायंकाळीं महाराज गडावरून " खालीं उतरून, निवडक लोक व लष्कर घेऊन चालिले. बाबाजी बापूजी व चिमणाजी बापूजी देशकुळकर्णी, तर्फ खेड, हे दोघे बहुत शाहाणे व शूर, राजियाचे प्रीतिपात्र. हे दोघे बंधु बरोबरी घेतले. आणि नवाबाचे गोटांत चालिले. ' कटकांतील लोक; चौकी पहाऱ्यास गेलों होतों ' " अशीं उत्तरें देत हे लोक लाल महालाच्या आवारांत आले.

रमजानचा उपवास सोडून रात्रीं खानाचीं माणसें झोपलीं. सर्वत्र सामसूम झालें. लष्करी बाजाचा आवाज होऊं लागतांच चिमणाजी

वापूनें स्वयंपाकघराला कुदळीनें भगदाड पाडलें. महाराज बरोबर होतेच. सारी मंडळी आंत शिरली. महालांत कापडी पडदे लावून खोल्या तयार केल्या होत्या. पडदे कापून मंडळी थेट खानाच्या खोलींत शिरली. तो जनानखाना होता. तेथील वायकांनीं मराठे पहातांच ओरडा केला. त्यावरोबर खानाचा मुलगा फातखान धांवून आला. या लोकांनीं त्याचें डोकें उडवलें. तेव्हां घावरून बायकांनीं दिवे मालवले.

इतक्यांत पुढच्या दरवाजांतील पाहारेकऱ्यांना कापीत बाबाजी वापूजी आपली टोळी घेऊन आला. त्याला स्वत: खान आडवा आला. त्यानें एकाला ठार मारलें. तेव्हां दुसऱ्यानें खानाच्या हातावर वार केला व त्याचीं बोटें तोडलीं.

खान मेला म्हणून त्याच्या वायकांनीं आकांत चालविला होता. शिवाय ही गडबड खानाच्या सैन्यांत पसरत होती. आपलें काम झालें; आतां थांबण्यांत अर्थ नाहीं असें ओळखून महाराजांनीं आपल्या लोकांना इषारा दिला. चौकी, लष्कराचे लोक गनीम कोठें म्हणून धांवू लागले होते. 'त्यांजबरोबर हेहि 'गनीम कोठें' म्हणोन धांवत धांवत बाहेर निघाले.' आणि जलदीनें सिंहगडास परत आले. (एप्रिल १६६३)

शाहिस्तेखान चिडला आणि त्यानें ताबडतोब सिंहगडावर फौजा पाठविल्या. पण वरून महाराजांनीं तोफांचा भडिमार करून त्या सैन्याची दाणादाण केली. खुद्द शाहिस्तेखानाचा हत्तीच तोफेचा गोळा लागून ठार झाला. तेव्हां त्यानें निमूटपणें माघार घेतली.

प्रचंड मोहिम काढून जें साधलें नसतें तें महाराजांच्या एका छाप्यानें घडून आलें. शाहिस्तेखान पुणें सोडून औरंगाबादेस गेला. त्याची नाचक्की झाली. औरंगजेब बादशहानें त्याची तडकाफडकी

बंगाल्यांत बदली केली. पण 'शास्ताखानास शास्त' करून महाराज थांबले नाहींत. त्यांनीं औरंगजेबाला आणखी एक धक्का देण्याचें ठरविलें.

★



# सुरतेवर उड्डाण

महाराजांनीं शाहिस्तेखानाची नाचक्की केल्यामुळें चिडून त्यानें महाराजांच्या मुलखाची वरीच नासधूस केली. तेव्हां मोंगलांना जरब बसविण्याचा महाराजांनीं एक व्यूह रचला. सिद्दी आणि पोर्तुगिज यांचें पारिपत्य करण्याचा पुकारा करून त्यांनीं जंजिऱ्याजवळ दंडा—राजपुरी व कल्याण येथें मोठ्या फौजा तयार केल्या. मध्येंच नाशिक येथें कांहीं काम उपस्थित करून ते नाशकाला आले.

महाराज नाशकांत आहेत असें सर्वत्र पसरविण्यांत आलें. पण चार हजार निवडक लोकांनिशीं ते सुरतेकडे दौड करीत होते. सुरतेंतील वित्तंबातमी बहिर्जी नाईकानें त्यांना अगोदरच पुरविली होती.

सुरतेंत त्यावेळीं ऐश्वर्य उधळत होतें. ती व्यापाराची प्रचंड पेठ होती; पश्चिम किनाऱ्याचें केंद्र होतें. हाजी सैयद बेग आणि वहर्जी बोहरा हे व्यापारी तर इतके सधन कीं त्यांची बरोबरी जगांत कोणीच

करूं शकणार नाहीं ! अशा सुरतेंत मोंगलांचा इनायतखान नांवाचा अंमलदार होता. त्याला पांचशें स्वारांचा तनखा मिळे. पण स्वार न ठेवतां तो स्वतःच तो पैका गडप करी. समृद्ध सुरतेच्या संरक्षणाची व्यवस्था ही अशी होती. त्यामुळें महाराजांच्या आगमनाची वार्ता समजतांच सुरतकरांना धडकी भरली.

पण महाराजांनीं माणसें पाठवून जाहीर केलें कीं, कोणाला त्रास देण्याची आपली इच्छा नाहीं. मोंगलांनीं माझ्या मुलखांत धुमाकूळ घातला म्हणून त्यांना मी शासन करणार आहें. 'मी सुरतेस येतांच समक्ष भेटून दंड ठरवा व रक्कम भरा' अशीं पत्रें त्यांनीं पाठविलीं.

पण इनायतखान गुर्मींत होता. स्वतः भेटीस न जातां वकिलातर्फे त्यानें उलट जाब विचारला, 'दंड काय हवा ?' वकिलाला अटक करून महाराजांनीं या उर्मटपणाचें उत्तर दिलें. दुसऱ्या दिवशीं महाराजांनीं खुद्द सुरतेच्या बाहेर तळ ठोकला. तरी त्यांना येऊन भेटण्याचें सौजन्य कोणी दाखविलें नाहीं.

दुसऱ्या दिवशीं तर इनायतखानानें आपल्या मूर्खपणाचा कळसच केला. त्यानें वकील म्हणून एक माणूस महाराजांकडे पाठविला. महाराजांशीं बोलणीं सुरू झालीं आणि या वकीलानें अवास्तव आणि वेडगळ अटी मांडण्यास सुरवात केली. तेव्हां महाराज रागानें म्हणाले, 'मराठे काहीं इनायतखानासारखे भागूबाई नाहींत.' आतां वकिलानें आपलें खरें स्वरूप प्रगट केलें. जामिया हातांत घेऊन तो महाराजांवर धांवून गेला. पण तो धांवत असतांनाच शेजारच्या पहारेकऱ्यानें त्याचा हात तोडला. तरी तो तसाच महाराजांच्या अंगावर पडला. महाराजांची छाती रक्तानें माखली. इनायतखानाच्या या विश्वासघातकीपणानें साम दामाचे मार्ग संपले.

महाराजांचे स्वार शहरांत घुसून लूट करूं लागले, घरें जाळूं

लागले. चार दिवस सर्व शहराची लूट चालली होती. वहर्जी बोहऱ्याचा भव्य वाडा लुटून, खणून, जाळून टाकण्यांत आला. तीच गत हाजी सय्यद बेगच्या वाडीची. एका हिंदु व्यापाऱ्याच्या घरांत तर २८ शेर वजनाचे मोत्यांचे कंठे सांपडले. या लुटींत सोनें, चांदी, मोती जवाहर यापेक्षां हलक्या मालाला मराठ्यांनीं हातच लावला नाहीं !

मोंगल फौजेच्या हालचालींचा सुगावा लागतांच महाराज वायु-वेगानें सुरतेहून निघाले आणि रायगडास येऊन पोंचले. सुरतेंत त्यांना सुमारें एक कोट रुपयांची लूट मिळाली.

यानंतर महाराजांनीं मोंगलांना दक्षिणेंत चांगलेंच सतावून सोडलें. दक्षिणेंतील एका मोंगल अधिकाऱ्याला लिहिलेल्या खोंचक पत्रांत महाराज म्हणतात, ‘ आमच्या ह्या कठीण प्रदेशांत नुसता कल्पनेचा घोडा सुद्धां नाचविणें कठीण आहे. मग तो प्रदेश काबीज करण्याची गोष्ट कशाला ! भलत्याच खोट्या बातम्या बादशहाकडे लिहून पाठ-विण्यास तुम्हाला लाज कशी वाटत नाहीं ? अत्यंत मजबूत असे साठ किल्ले आज माझे तयार आहेत, पैकीं कांहीं समुद्र किनाऱ्यावर आहेत. आपल्या भूमीचें संरक्षण करणें माझें कर्तव्य आहे. ’


★

## बाजी घोरपड्याचें तळपट

महाराजांनीं दक्षिण कोंकणांत दौड करून वाडीकर सावंतांना नमविलें आणि कुडाळ प्रांत कब्जांत आणला. तेव्हां विजापुरकरांनीं इख्लासखान, खवासखान, बाजी घोरपडे यांना कुडाळकडे पाठविलें. विश्वासघातकी बाजी घोरपड्याचा सूड महाराजांना घ्यायचा होताच. हा सूड आपण कसा घेतला हें स्वतः महाराजांनींच पत्र पाठवून शहाजीराजांना कळविलें आहे. महाराज म्हणतात, ‘ त्यांस बाजी

घोरपडे पुढें मुधोळास घरीं कांहीं जमतेनसीं आले हें कळतांच फौजेनसीं आम्हीं तेच क्षणीं स्वारी केली. त्यांचा प्रांत लुटून तळपट जान करून ठाणियास जेरदस्तीत आणिले. हें जाणोन त्यांणी सर्व जमतेनसीं लढाईस निघाले. युद्ध तारफेचें जाहालें. बाजी मारिले व कितेक खासे लोक पडले. या प्रकारें तो प्रसंग करून लुटून फस्त केले. मत्ता बहुत लागली. पुन्हा आपलेसे करून मुधोळ पंचमहाल आपला करून स्थापिले.' खवासखान आणि सावंत यांना वेगवेगळे गांठून त्यांचाहि महाराजांनीं असाच निःपात केला.

दक्षिण कोंकणच्या या भेटींत महाराजांनीं पश्चिम समुद्रावर एक नाकें हेरलें आणि मालवणला समुद्रांत प्रचंड सिंधुदुर्गाची उभारणी



: सिंधुदुर्ग :

केली. 'सिंधुदुर्ग जंजिरा, जगीं अस्मान तारा, जैसें मंदिराचें मंडन श्री तुलसी वृंदावन, तैसा महाराजांचे राज्याचा भूषणप्रद अलंकार, चतुर्दश महारत्नांपैकींच पंधरावें रत्न महाराजांस प्राप्त झालें.' असा हा सिंधुदुर्ग आहे.

कर्नाटकांत बिदनूरच्या लढाईवर असलेले शहाजी राजे शिकारीला गेले असतां भंडोळींत घोड्याचा पाय अडकून खालीं पडले व गतप्राण

झाले. (२३–१–१६६४). ' तुम्हांस श्रीसांब व अंबा यश देणार पूर्ण आहे ' व ' आमचे मनोदय शेवटास नेणार तुम्ही सुपुत्र निर्माण आहां ' असें मनोगत शहाजीराजांनीं यापूर्वीं महाराजांस कळविलें होतें.

★

## जयसिंग दक्षिणेंत आले

महाराजांच्या एकेक कृत्यानें औरंगजेब बादशहाचा संताप होत होता. शाहिस्तेखानाची नाचक्की आणि सुरतेची लूट या प्रकारांनीं तर त्याच्या अंगाचा तिळपापड झाला. त्यामुळें महाराजांचा समूळ उच्छेद करण्यासाठीं औरंगजेबानें आपला महापराक्रमी सरदार मिर्झा राजा जयसिंग याला दक्षिणेंत पाठविण्याचें ठरविलें.

मिर्झा राजा जयसिंग यानें पन्नास वर्षें मोंगल सैन्यांत काम केलें होतें. त्यानें हिंदुस्थानांत आणि हिंदुस्थानबाहेर मोठमोठ्या मोहिमा करून विजय संपादन केले होते. मोंगल दरबारांत त्याला शहाजाद्या इतका मान असे. पण युद्धकौशल्यापेक्षांहि मुत्सद्देगिरीबद्दल त्याची ख्याति अधिक होती. त्याचें वागणें मायावी आणि बोलणें लाघवी होतें.



: मिर्झा राजा जयसिंग :

राजा जयसिंग चौदा हजार फौज आणि दिलीरखान, दाऊदखान कुरेशी, राजा रायसिंग सिसोदिया, सुजनसिंग बुंदेला असे अनेक मुसलमान व हिंदु सरदार बरोबर घेऊन दक्षिणेंत आला व पुण्यानजिक तळ देऊन बसला.

महाराजांविरुद्ध जेवढ्या लोकांना उठवतां येईल तेवढ्यांना उठविण्याचा उपक्रम जयसिंगानें प्रथम हातीं घेतला. विजापूरकर आणि शिवाजीमहाराज एक होऊं नयेत यासाठीं त्यानें प्रथम विजापूरकरांना आपल्याकडे वळवून घेतलें. कर्नाटकांतील सरदार जमीनदारांकडे त्यानें वकील पाठविले. महाराजांविरुद्ध प्रथमपासून असलेले मोरे वगैरे सरदार तर त्यानें उठवलेच, पण खुद्द महाराजांच्या सैन्यांतील सरदारांतहि लांचलुचपत सुरू केली.

जयसिंगानें आपला तळ सासवड येथें नेला आणि महाराजांचा प्रदेश उध्वस्त करण्याचा सपाटा चालविला. दिलीरखानानें पुरंदराला वेढा दिला. भुलेश्वर, रुद्रमाळ, वज्रगड, मोरगिरी, केळणा असे किल्ले मिळून चार मैल परिघाचा पुरंदर तयार झाला आहे. तेथें घनघोर युद्ध सुरू झालें. रुद्रमाळ पडला. पुरंदरचा किल्लेदार मुरारबाजी यानें अद्भुत पराक्रम केला. ‘ ज्याच्या कवंधानें भूतळीं । सातशें पुरंदरीं ’ शत्रू मारले असे त्याचे पवाडे झाले. तसूतसू जागेसाठीं मराठे प्राण देत होते. पण मोंगलांचा जोर वाढतच होता.



: दिलेरखान :

भेद आणि दंड हे उपाय चालू असतांनाच जयसिंगानें महाराजांकडे साखर पेरण्यास सुरवात केली. त्यानें शरण येण्याचा सल्ला दिला, आपल्या मध्यस्थीचें आश्वासन दिलें, स्वतःच्या हिंदुधर्माचीहि आठवण दिली.

जयसिंगाची मोहीम हें स्वराज्यावरील प्राणसंकट होतें. त्याच्या फौजेशीं टक्कर देत रहाणें म्हणजे दगडी भिंतीवर टक्कर घेण्यासारखेंच होतें. जयसिंगाला वळवून त्याच्याशीं तह करणें हाच महाराजांपुढें मार्ग होता. महाराजांनीं प्रथम त्याचा धर्माभिमान जागृत करण्याचा

प्रयत्न केला. पण तो फारसा यशस्वी झाला नाहीं. वाटाघाटीच्या निमित्तानें पत्रापत्री सुरू झाली. मुत्सद्देगिरीचे डावपेंच पडूं लागले. महाराजांच्या अंगांतील साहसानें पुन्हा उचल खाल्ली.

जयसिंगाकडून सुरक्षिततेचें वचन घेऊन महाराज आपण होऊन त्याच्या भेटीस गेले. महाराजांच्या आगमनानें जयसिंगाच्या गोटांत खळबळ उडून गेली. पण महाराजांनीं त्याचा विश्वास संपादन केला. जयसिंगाच्या तंबू शेजारीं ठोकलेल्या तंबूंत त्यांनीं वास्तव्य केलें होतें.

एके दिवशीं रात्रीं जयसिंग, त्यावेळीं इकडे आलेला परदेशी प्रवासी मनुची याचेबरोबर पत्ते खेळत बसला असतां महाराज अचानक तेथें गेले. या आकस्मिक भेटीनें ते दोघे चमकले. जयसिंगानें उठून त्यांचा आदर केला. यावेळीं महाराजांनीं मनुचीची ओळख करून घेतली आणि युरोपांतील राजे आणि राज्यकारभार यांची माहिती त्याच्याकडून विचारून घेतली.

जयसिंगाशीं झालेल्या भेटींत महाराजांनीं त्याच्यावर आपली छाप बसविली. वाटाघाटी चालू होत्या. शाब्दिक पेंचांत प्रत्येकजण दुसऱ्याला पकडूं पहात होता. कोणीच हरेना. पण महाराजांना माघार घेणें भाग होतें. पुरंदरचा तह ठरला. २३ किल्ले आणि ४ लक्ष होनांचा मुलूख महाराजांनीं मोंगलांच्या स्वाधीन करावा, बादशहानें संभाजी राजांना पांचहजारी मनसब आणि पांच हजार स्वार द्यावे, विजापूरकरांविरुद्ध महाराजांनीं मोंगलांस मदत करावी असें उभयपक्षीं ठरलें.

मोंगली सत्तेच्या गुलामींत महाराजांना जखडून टाकण्याची जयसिंगाची कोशीस चालू होती. तर जयसिंगाचें संकट टळेपर्यंत कांसवाप्रमाणें अंग चोरून रहाण्याचे महाराजांचे प्रयत्न चालू होते.

★



# महाराज उत्तरेस निघाले

पुरंदरच्या तहानंतर मोंगलांची विजापूरकरांवर मोहीम सुरू झाली. पण त्यांत अपेक्षित यश येईना. महाराजांची मदत होतीच. पण महाराज अन्त:स्थपणें विजापूरकरांना सामील आहेत असें दिलीरखानाचें म्हणणें होतें. इतक्यांत महाराजांचा सेनापति सरनोबत नेताजी पालकर याचें महाराजांशीं भांडण झालें व तो विजापुरकरांना मिळाला. त्यामुळें मोंगलांची आणखीच पिछेहाट होण्यास सुरुवात झाली.

महाराज विजापूरकरांना मिळाले तर काय प्रसंग ओढवेल याची जयसिंगाला आतां कल्पना आली. महाराजांनीं बादशहाच्या भेटीस जावें असे प्रयत्न त्यानें पूर्वीं केले होते. पण आतां त्यानें ते प्रयत्न निकरानें चालविले. महाराजांचा मोंगल दरबारांत शहाजाद्याप्रमाणें मान होईल, दक्षिणेची सुभेदारी त्यांना मिळेल, सिद्दीकडून जंजिरा घेतां येईल अशीं अनेक प्रलोभनें त्यानें महाराजांना दाखविलीं. कांहीं करून महाराजांना दक्षिणेंतून दूर घालवून द्यायचें एवढा जयसिंगाचा निश्चय होता. 'तुमचे जिवास कोणताहि अपाय आम्ही होऊं देणार नाहीं, त्याबद्दल मी व माझा पुत्र रामसिंग जामीन आहों' अशा शपथा व करार जयसिंग व त्याचा पुत्र यांनीं केल्या.

पण महाराजांच्या मंत्रिमंडळाचा उत्तरेंत प्रयाण करण्यास रुकार मिळेना. तरीहि त्यांनीं आग्र्यास जाण्याचा निश्चय ठरविला. सर्व

कारभार जिंजावाई मातोश्रीकडे सोंपवून मोरोपंत पिंगळे प्रधान, मुजुमदार निळो सोनदेव व सेनापति प्रतापराव गुजर यांना त्यांच्या दिमतीस दिलें. आपल्या मुलखांत सर्वत्र फेरी मारून सर्वांचे निरोप घेतले आणि पूर्वीच्या शिस्तीनें चालण्याची आज्ञा दिली. तानाजी मालुसरे, येसाजी कंक, हिरोजी फर्जंद, बाळाजी आवाजी, निराज़ी रावजी अशी निवडक मंडळी आणि चार हजार स्वार घेऊन महाराजांनीं उत्तरेस प्रयाण केलें.

महाराज महासाहसी होते. पण साहस कशासाठीं ? 'भूषन भनत छर छन्दी मतिमन्द महा, सौ सौ चूहे खाय के विलारी बैठी तप के' अशा विश्वासघातकी बादशहाची काय महाराजांना ओळख नव्हती ? जयसिंगानें सांगितलेल्या गोष्टी मिळविण्यासाठीं महाराज आग्र्याला जातील हें तर्काला पटत नाहीं. उत्तरेंतील मोंगली सत्तेचा पोकळपणा कदाचित् जयसिंगाकडून महाराजांनीं काढून घेतला असेल. आणि स्वतः तिकडे जाऊन खुद्द राजधानींत गोंधळ उडविण्याचा त्यांचा विचार असेल ?

महाराज उत्तरेंत निघाले, पण त्यांची कीर्ति अगोदरच तिकडे पोंचली होती. ते औरंगाबादेस गेले तेथें लोकांचे थवेच्या थवे त्यांच्या दर्शनासाठीं आले. तेथून दरकूच दरमजल करीत ते आग्र्यास आले. वाटेंत त्यांची बडदास्त शहाजाद्याप्रमाणें ठेवण्यांत आली होती.

औरंगजेबाचा ५० वा वाढदिवस १२ मे १६६६ रोजीं होता. त्या दिवशीं प्रचंड दरबार भरला. महाराज दरबारांत आले. त्यांना घेण्यासाठीं अडीच हजारी मनसबदार रामसिंग आला. बरोबरीच्या नात्यानें भेट व्हावी असा महाराजांनीं आग्रह धरला. पण तें अशक्य आहे असें रामसिंगानें समजावलें. अपशकुनाला सुरवात झाली. रामसिंगानें महाराज व संभाजी यांना सिंहासनाकडे नेलें.

' या शिवाजीराजे ' म्हणून बादशहानें त्यांचें स्वागत केलें. महाराजांनीं नजराणा ठेवला. मयुरसिंहासनापुढें सिंहानें मस्तक नमविलें पण बादशहानें खूण करतांच महाराजांना पांच हजारी सरदारांच्या रांगेंत उभें करण्यांत आलें. पुरंदराच्या तहानें संभाजी राजे पांच हजारी झाले. महाराजांचे सेनापति पांच हजारी होते. महाराजांसमोर असलेल्या कित्येक सरदारांना महाराजांच्या फौजेनें पाणी पाजलें होतें. तरी महाराज पांच हजारी ? ते बेभान झाले, ' प्राण देईन, पण हा अपमान सहन करणार नाहीं ' असें आवेशानें बोलूं लागले.

दरबारी आदब बिघडली. महाराजांची मुक्कामात्रर रवानगी झाली. त्यांच्या भोंवतीं चौकी–पहारे बसले.



: औरंगझेब :

★

## खरेंच चेटुक केलें !

महाराजांनीं प्रसंग ओळखला. मोहरा फिरविला. आपल्या वकिलाला पाठवून एकांतीं भेटीची मागणी केली. औरंगजेबाच्या



: मिठाईच्या पेटाऱ्यांत बसून महाराज व संभाजीराजे आग्रा शहराबाहेर आले :

मुठींत सर्व सत्ता आंवळली गेली होती. त्या मुठीचाच चक्काचूर करण्याचा तर महाराजांचा हेतू नसेल? पण महाराजांना चेटकी विद्या अवगत आहे, ते अदृश्य होतात, हवेंत तरंगतात अशा अफवा सर्वत्र पसरल्या होत्या. शिवाय अफझुलखान आणि शाहिस्तेखान यांची त्यांनीं काय स्थिती केली हें औरंगजेवाला माहीत होतें. भेटीचा वेत हुकला.

महाराजांना दुसऱ्या एका लहान बंगल्यांत हलविण्याचा विचार होऊं लागला. याचा अर्थ त्यांनीं ओळखला. आतां तडकाफडकीं आपली मुक्तता करून घेतली पाहिजे, असें त्यांनीं ठरविलें. त्यांनीं दीन मुद्रा धारण केली. वादशहाच आपला रक्षणकर्ता असें ते प्रत्येकाला सांगूं लागले. मध्यंच बादशहाकडे अर्ज करून त्यांनीं आपला लवाजमा स्वदेशीं पाठविण्याची परवानगी मागितली. ते लोक गेल्यावर महाराज आजारी असल्याचा बोभाटा झाला. औषधपाणी सुरू झालें; दानधर्महि चालू झाला. ब्राह्मण, बैरागी, साधु, फकीर यांच्याकडे पेटारे भरभरून मिठाई जाऊं लागली. दरबारच्या अमीर उमरावांनाहि भेटी जाऊं लागल्या. 'नाना जिन्नस मेवा खरेदी करून आणविला. आणि वेळूचे पेटारे आणवून १० पेटारे मेवा भरिला. एका पेटाऱ्यास दोघे मजूर लावून, मध्यें लांकूड घालून मेवा वजीरांस पाठविला.' सुरवातीला पेटाऱ्यांची कडक तपासणी होत असे. पण रोजच पेटारे भरून जाऊं लागले. तपासणी कमी कमी होत गेली.

एके दिवशीं पाहरेकऱ्यांना कळविण्यांत आलें, कीं 'महाराज फार आजारी आहेत. दोन दिवस झोंप नाहीं, कोणी गडवड करून त्रास देऊं नका.' त्या दिवशीं मिठाईचे पेटारे गेले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पाहारेकरी आंत डोकावले. महाराजांच्या बिछान्यावाहेर त्यांचें सोन्याचें कडें असलेला हात दिसत होता. नोकर पाय चेपीत होता.



: वैराग्याच्या वेषांत महाराजांनीं मातोश्री जिजाबाईंची भेट घेतली :

दुपारीं हिरोजी फर्जंद आणि मदारी मेहतर बाहेर आले. महाराजांस झोंप लागली आहे, उठवूं नका. आम्ही औषध घेऊन येतों, असें सांगून बाहेर गेले. किती वेळ झाला तरी हे नोकर आले नाहींत आणि आंत तर सामसूम होतें तेव्हां पाहारेकरी आंत डोकावले. रिकामी खोली त्यांना खायला आली! महाराज पसार झाले ही वार्ता वाऱ्यासारखी पसरली. त्यांच्या मागावर चारी दिशांना औरंगजेबाचीं माणसें सुटलीं.

आदल्या दिवशीं महाराज आणि संभाजीराजे मिठाईच्या पेटाऱ्यांत बसून शहराबाहेर आले होते. तेथून सहा मैलांवर रानांत निराजी रावजी, दत्ताजी त्रिंबक वगैरे घोडे सज्ज करून होतेच. तेथून ते रातोरात मथुरेस आले. कांहीं माणसें दक्षिणेस गेलीं. तीं औरंजेबाच्या माणसांनीं पकडलीं. महाराज बैरागी झाले आणि उत्तरेकडे तीर्थयात्रा करीत निघाले. अनेक तऱ्हेचे वेष पालटीत गोंडवण, गोवळकोंडा, विजापूर अशा मार्गानें रायगडाकडे निघाले. वाटेंत अनेक संकटें त्यांना आडवीं येत आलीं, पण प्रत्येकाला त्यांनीं झुकांडी दिली.

शेवटीं महाराज 'भीमा उतरून पांचाडी येऊन रायगडच्या दरवाजियास दाखल झाले. जिजाऊस खबर केली जे, बरागी झुंडी उत्तरेकडून आले. हें वर्तमान ऐकतांच परवानगी जाली. जिजाऊच्या दर्शनास बैरागी वेशें गेले. निराजीपंतें आशीर्वाद केला. सिवाजीराजे त्याणीं मातुश्रीस जाऊन पायांवर डोई ठेविली. मातुश्रीनें वळखिलें नाहीं. डोईची टोपी काहाडिली. तेव्हां वलखिले. ते समयीं आनंद झाला.' 'रायगडास आलियावर थोर धर्म मोठा महोत्सव केला. साखरा वांटल्या. तोफांचे आवाज केले. मातुश्रीनें व कारकुनांनीं व लष्कर, गड, कोट, हशम सर्वांनीं संतोष करून खुशाली केली.' (२० नोव्हेंबर १६६६)

महाराज आले. पण संभाजीराजे मागेंच मथुरेला होते. ते मृत्यु पावले असा बोभाटा करून महाराजांनीं त्याचें उत्तरकार्यहि केलें. पुढें मथुरेहून तीन ब्राह्मणांनीं 'संभाजी राजियास जानवें व वस्त्रें नेसवून, आपला भाचा म्हणवून रायगडास' आणिलें.

औरंगजेबाच्या तुरुंगांतून त्याच्या डोळ्यांदेखत महाराजांनीं केलेल्या या उड्डाणामुळें त्यांची दिगंत कीर्ति झाली. औरंगजेबाच्या प्रतिष्ठेला हा फटकाच होता. त्याची बादशहानें इतकी दहशत घेतली कीं, महाराजांच्या हयातींत दक्षिणेकडे स्वत: येण्याची त्याची छाती झाली नाहीं !

★


## बादशाही गदगदां हालविली

महाराज धाडसी वीर होते, तसेच थंड डोक्याचे मुत्सद्दी होते. औरंगजेबाच्या हातावर तुरी देऊन आल्यावर त्यांनीं दक्षिणेंत एकदम रौद्रावतार धारण केला नाहीं. उलट संतापानें हात चोळीत बसलेल्या औरंगजेबापुढें त्यांनीं अधिकच नम्रता दाखविली. प्रथम त्यांना आपल्या राज्याची व्यवस्था चोख करावयाची होती. बादशाहाच्या सेवेस तयार आहें, असें भासवून त्यांनीं पुरंदरचा तह पुन्हां कायम केला. त्या निमित्तानें औरंगाबादच्या सरहद्दीवर प्रतापराव गुजर याच्या हाताखालीं मोठी फौज ठेवून दिली. विजापूर, व गोवळकोंडा येथील सुलतानांकडून चौथाई व सरदेशमुखीच्या हक्कांबद्दल अनुक्रमें तीन लाख व पांच लाख वसूल करण्यास सुरवात केली. आणि आपल्या या हक्काला मोगलांची मान्यता मिळविली. पोर्तुगिजांशीं तह करून त्यांचा वकील दरबारीं ठेवून घेतला. अशा तऱ्हेनें आपल्या राज्याला सर्वांकडून राजनैतिक मान्यता मिळविली.

राज्याची स्थिरस्थावरता आणि फौजेची तयारी यांत अशीं दोन वर्षे गेलीं. दक्षिणेंत असलेले मोगलांचे अधिकारी शहाजादा मुअज्जम आणि दिलीरखान यांची चुरस वाढत होती. त्यांचें बळ ढांसळत होतें. महाराजांना संधि हवी होती.

आणि ही संधि औरंगजेबानें दिली. आग्र्याला प्रयाण करण्यासाठीं त्यानें महाराजांना एक लक्ष रुपये दिले होते. ते वसुल करण्यासाठीं त्यानें संभाजी राजांना दिलेली वऱ्हाडांतील जहागीर जप्त केली. झालें. पुरंदरचा तह मोडला. वऱ्हाडांतील सरनौवत प्रतापराव गुजरांची फौज मोंगल मुलखांत तुटून पडली.

महाराजांनीं औरंगजेबाविरुद्ध युद्ध पुकारलें. झंझावाताप्रमाणें मराठी सेना निघाली. पुरंदरच्या तहानें गेलेले किल्ले एकामागून एक हस्तगत करण्यांत येऊं लागले. पण कोंडाणा अवघड होता. त्याच्यावर कडवे रजपूत होते. उदेभान किल्लेदार होता. तो किल्ला घेण्यास तानाजी मालुसरे निघाला. तटास घोरपड लावून तीनशें मावळ्यांसह तानाजी किल्ल्यावर आला. निकराची लढाई झाली. तानाजीची उदेभानाशीं गांठ पडली. ते दोघे वीर जखमी होऊन पडले. इतक्यांत मावळ्यांनीं कल्याण दरवाजा उघडला. सुर्याजी मालुसरे आंत आला. किल्ला सर झाला.



: कोंडाणा :

सिंहगड हातीं आला; पण तानाजी सिंह पडला. त्याच्या मृत्यूचें काव्य अमर झालें.

पुरंदर जिंकला. मोंगलांचा मुलुख लुटला जात होताच. पुन्हा महाराजांनीं सुरतेवर स्वारी केली. तीन दिवस शहर लुटलें. सासष्ट लक्ष लूट घेऊन महाराज परतत असतां दिंडोरी नजिक मोंगल सरदार दाऊदखान आडवा आला. त्याला चकवून आणि अनेक सरदारांचा मोड करीत महाराज रायगडास परतले.



: नरवीर तानाजी :

इकडे प्रतापरावानें वऱ्हाडची मोहीम चालवली. एकट्या कारंजा शहरांतून चार कोट लूट आणली. ठिकठिकाणीं चौथाई वसूल करण्यास सुरवात झाली. मोंगलांनींहि यावेळीं आपल्या फौजा मराठ्यांवर लोटल्या. पण मोरोपंत पिंगळे, प्रतापराव गुजर यांनीं त्यांचा ठिकठिकाणीं मोड केला. मोरोपंतानें बागलाण जिंकलें, कोंकण कबजांत आणलें.

अद्यापि पन्हाळा विजापूरकरांच्या हातीं होता. ही तर स्वराज्याची दक्षिण राजधानी तेव्हां ती जिंकणें आवश्यक होतें. शें दोनशें मावळे अंधाऱ्या रात्रीं दोऱ्यांवरून तटावर चढले. किल्ल्यांतील कांहीं शिबंदी आधींच फितवून ठेवलेली होती. या दोनशें लोकांनीं कर्णे वाजवून पहारेकऱ्यांत एकच गोंधळ उडवून दिला. पन्हाळा हस्तगत झाला.

हें वर्तमान कळतांच विजापूर दरबारांत संताप झाला. बहलोलखानाच्या हाताखालीं फौज देण्यांत आली आणि तो पन्हाळ्याकडे चाल करूं लागला. महाराजांनीं त्याच्यावर प्रतापराव गुजरांना पाठविलें. प्रतापरावानें खानाला उंबराणीजवळ एकदम वेढलें आणि त्याची कोंडी केली. निकराची लढाई झाली; खानाचा मोड झाला. पण तो शरण येतांच प्रतापरावानें त्याला सोडून दिलें.

बहलोलखानाला हातांतून सोडून दिल्याचें महाराजांना समजतांच त्यांनीं क्रोधानें प्रतापरावाला कळविलें, 'बहलोलखानाशीं गांठ घालून, बुडवून फत्ते करणें. नाहींतर तोंड न दाखविणें.' महाराजांचे शब्द त्याच्या जिव्हारीं झोंबले. त्यानें विजापुरी मुलखाची धुळधाण करण्यास सुरवात केली; लक्ष मात्र बहलोलखानावर होतें. नेसरीच्या खिंडींत बहलोल दिसतांच प्रतापराव संतापानें वेडा झाला. मराठी फौज मागेंच राहिली आणि प्रतापरावानें अवघ्या सात शिपायांनिशीं बहलोलच्या अफाट फौजेवर झेंप टाकली. स्वामिनिष्ठेचा पोवाडा निर्माण करून प्रतापराव पडला. ( २४-२-१६७४ )

तीन वर्षे मराठे जीवाची तमा न धरतां लढत होते. पराक्रम तर मुळचाच होता पण त्याला राष्ट्रभक्तीचें तेज चढलें होतें. स्वातंत्र्याच्या ध्येयवादाचें ओज त्यांत दिसत होतें. महाराजांच्या स्फूर्तीनें ते मोंगल बादशाही गदगदां हालवीत होते. त्यानीं स्वराज्य स्थापन केलें होतें.

बुडाले भेदवाही ते । नष्ट चांडाळ पातकी ॥
ताडिले पाडिले देवें । आनंदवन भूवनीं ॥
विघ्नांच्या उठिल्या फौजा । भीम त्यावरि लोटला ॥
घर्डिलीं चिर्डिलीं रागें । रडविलीं बडविलीं बळें ॥
कल्पांत मांडिला मोठा । म्लेंच्छ दैत्य बुडावया ॥
कै पक्ष घेतला देवीं । आनंदवन भूवनीं ॥
बुडाले सर्वहि पापी । हिंदुस्थान बळावलें ॥
अभक्तांचा क्षयो झाला । आनंदवन भूवनीं ॥
बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छ संहार जाहला ॥
मोडिलीं मांडिलीं क्षेत्रें । आनंदवन भूवनीं ॥

असा सर्वत्र आनंद भरून राहिला होता. पण महाराज अजून छत्रपति नव्हते.

★

## ब्राह्मणांस शह

'मुसलमान बादशाहा तक्तीं वसून, छत्र धरून, पातशाही करितात, आणि शिवाजी राजे यानींही चार पादशाही दबविल्या आणि पाऊण लाख घोडा लष्कर गड कोट असें असतां त्यांस तक्त नाहीं, या करितां मऱ्हाठा राजा छत्रपती व्हावा.' हें कांहीं केवळ गागाभट्टाचेंच मत नव्हतें; उभ्या महाराष्ट्रालाहि तसेंच वाटत होतें. महाराजांचा विचार तोच होता. राज्याभिषेकाला सर्वस्वीं अनुकूल वेळ आतां आली होती.

राष्ट्रीय भावनेच्या पायावर राज्याची निर्मिति झाली. तरी प्रजेची चिरनिष्ठा मिळविण्यासाठीं राजपदाची स्थापना व्हायला हवी होती. कारण राजपदामध्यें राष्ट्राचें प्रतीक पहाण्याची कल्पना परंपरागत होती. धर्म आणि शास्त्र यांची जबरदस्त मोहिनी जनमनावर होती. आणि म्हणून राजपदाला प्रतिष्ठा येण्यासाठीं विधिपूर्वक राज्याभिषेकाची आवश्यकता होती.

पण तेथेंहि एक अडचण आली. राज्याभिषेकाचा अधिकार फक्त क्षत्रियाला. आणि कलियुगांत ब्राह्मण आणि शूद्र हे दोनच वर्ण शिल्लक आहेत, असें अहंकारी प्रतिपादन कांहीं ब्राह्मण विद्वानांनीं चालविलें होतें. ही सामाजिक ब्राह्मणी अधिसत्ता उलथून क्रांति करायची हें ब्रह्मांडा एवढें काम होतें. त्यांनीं राजकारणी बुद्धीनें हें कार्य टाळलें आणि काशीच्या गागाभट्टाला हाताशीं धरून अहंकारी ब्राह्मणांना शह दिला. महाराजांच्या मनावर चातुर्वर्ण्याची छाप होतीच.


गागाभट्ट 'थोर पंडित, चार वेद साहा शास्त्रें योगाभ्याससंपन्न, ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येनें निपुण, कलियुगींचे ब्रह्मदेव' होते. 'त्यांनीं राजियाचे वंशाचा शोध करितां राजे शुद्ध क्षत्रिय शिसोदे उत्तरेहून दक्षिणेस एक घराणें आलें तेंच राजियाचें घराणें असें शोधिलें.'

★



# छत्र धारिलें

इतकें झाल्यावर विद्वान, पंडित, सरदार यांना आमंत्रणें देण्यांत आलीं. सबंध हिंदुस्थानांतून या समारंभासाठीं ब्राह्मण आले. पाहुणे आले. हा सोहळा पहाण्यासाठीं हजारों लोक आले. अशी जवळ जवळ एक लक्ष मंडळी रायगडावर जमली. या सर्वांना मिष्टान्न भोजन प्रत्यहीं मिळत होतें.



: रायगड :

महाराजांनीं चिपळुणास जाऊन परशुरामाची पूजा केली. प्रतापगडावर भवानी मातेचें दर्शन घेऊन दीड मण वजनाची सुवर्णाची छत्री अर्पण केली.

रायगडावर परत आल्यावर २९ मे १६७४ रोजीं महाराजांचें उपनयन झालें, गायत्रीमंत्राचा उपदेश झाला. दुसरे दिवशीं ज्ञाताज्ञात दोषपरिहार्थ सप्त धातु आणि सप्त धान्यें यांत महाराजांची तुला झाली. त्यावर एक लक्ष होन ठेवून तें सर्व, ब्राह्मणांस दान केलें.

महाराजांनीं शुभ्र पोषाख केला. गळ्यांत पुष्पांचे हार घातले. कपड्यांवर सुवासिक द्रव्यें शिंपडून इतर अलंकार भूषणें परिधान केलीं.



: राज्याभिषेक झाल्यावर इंग्रजांचा वकील हेन्री ऑक्झंडन याने महाराजांना नजराणा सादर केला :

आणि ते अभिषेकासाठीं सुवर्ण–चौकीवर येऊन बसले. चौकी दोन फूट उंच, दोन फूट चौरस होती. डाव्या बाजूस पट्टराणी सोयराबाई, मागें युवराज संभाजी बसले. 'सुवर्णाचे कलश केले व सुवर्णाचे तांब्ये केले. आठ कलश व आठ तांब्ये यांनीं अष्टप्रधानांनीं राजियास अभिषेक' सप्त महानद्या व समुद्र यांच्या उदकांनीं मंत्रोच्चाराच्या घोषांत केला.



: छत्रपति शिवाजी :

'शके १५९६ आनंद संवत्सर ज्येष्ठ शु. १२ शुक्रवार रोजीं तीन घटका रात्र उरली तेव्हां राजे सिंहासनीं बैसले.' 'तख्त सुवर्णाचें बत्तीस मणाचें सिद्ध करविलें. नवरत्नें अमोलिक जितकीं कोशांत होतीं त्यामध्यें शोध करून मोठीं मोलाचीं रत्नें तख्तास जडाव केलीं' असें सिंहासन होतें. 'सिंहासनास अष्टखांब रत्नजडित केले.' 'छत्र जडावाचें मोतीलग झालरीचें करून मस्तकावर धरिलें.' अष्ट दिशांना अष्टप्रधान उभे राहिले. महाराज सिंहासनावर बसतांच ब्राह्मणांनीं मंत्राक्षता व इतरांनीं सुवर्णरौप्य पुष्पांची त्यांच्यावर वृष्टि केली. गागा भट्टानें मोत्यांचा तुरा लावलेला राजमुकुट महाराजांच्या मस्तकीं ठेवला.

त्यानंतर नजराणे झाले. इंग्रजांचा वकील हेन्री ऑक्झंडन यानें हिरेजडीत आंगठी, शिरपेंच, सलकडीं नजर केलीं. त्याला पोषाख देण्यांत आला. दरबार संपल्यावर महाराजांची हत्तीवरून स्वारी निघाली. देवदर्शन करून मिरवणूक परत आली. 'संपूर्ण खर्चाची

संख्या एक क्रोड बेचाळीस लक्ष होन झाले.' अखिल महाराष्ट्रांत आनंदीआनंद झाला. मेघराजहि संतुष्ट होऊन अपार वर्षला.

★

## कृतार्थ राजमाता!

राज्याभिषेकाच्या तेराव्या दिवशीं राजमाता जिजाबाई स्वर्गवासी झाल्या. सत्पुत्राचा राज्याभिषेक पाहून त्यांचे पांग फिटले होते. सुखाची परमावधि झाली होती. त्यांच्या पूर्वायुष्यांतील हाल अपेष्टांचा पुरेपूर वचपा निघाला होता. स्वराज्याचें ध्येय सफल झालें होतें. कृतकृत्य होऊन त्या माऊलीनें देह ठेवला.

राज्याभिषेकाच्या वेळीं त्यावेळचे प्रसिद्ध शाक्तपंथी गुरु निश्चलपुरी हजर होते. तो वैदिक समारंभ त्यांना मानवला नाहीं. शाक्तपंथाप्रमाणें पुन्हां राज्याभिषेक झाला नाहीं तर आपल्यावर सारखीं संकटें येतील असें त्यांनीं महाराजांस सांगितलें. या संकटांची प्रचीति राज्याभिषेकाच्या तेराव्या, बाविसाव्या व पंचावन्नाव्या दिवशीं येईल असेंहि त्यांनीं सांगितलें. तेराव्या दिवशीं राजमाता जिजाबाई निवर्तल्या. बाविसाव्या दिवशीं प्रतापगडवारील खास पागेला आग लागून कित्येक घोडे व एक हत्ती जळून गेला. तेव्हां आणखी एक समारंभ करण्यांत बिघडतें कोठें, असा विचार करून निश्चलपुरींच्या हस्तें २४ सप्टेंबर १६७४ रोजीं रायगडास दुसरा राज्याभिषेक करविला.

राज्याभिषेक व राज्यारोहण यांच्या संपूर्ण खर्चाची संख्या एक कोटी बेचाळीस लक्ष होन झाली. त्यामुळें खजिना रिकामा झाला होता. शिवाय राज्यारोहण समारंभाच्या वेळीं औरंगजेबाच्या सांगण्यावरून त्याचा मुलगा बहादूरखान विघ्नसंतोषीपणाचे प्रकार करीत होता. तेव्हां त्याला प्रथम शिक्षा देणें जरूर होतें. त्याप्रमाणें दोन हजार स्वारांची एक टोळी त्याच्या छावणीवर चालून गेली.

छावणींतून खानाचें सैन्य धांवून आलें. या सैन्याला अंगावर घेत घेत मराठे स्वार पन्नास मैल मागें हटले. इतक्यांत मराठ्यांच्या सात हजार स्वारांच्या दुसऱ्या टोळीनें मागून येऊन छावणीवर हल्ला केला आणि एक कोटी खजिना, दोनशें घोडे ताब्यांत घेऊन व छावणीच्या तंबूंना आग लावून ही टोळी सावकाश परत आली.

★

## कोणत्या पराक्रमाला भिऊं ?

खुद्द महाराज बाहेर पडून मोंगलांचा प्रदेश लुटीत होतेच. अशा रितीनें जेरीस आलेल्या बहादूरशहाला चकविण्यासाठीं महाराजांनीं एक राजकारण केलें. देशावर राज्यविस्तार करीत असतां पश्चिम किनाऱ्याकडे महाराजांचें कधींच दुर्लक्ष झालें नव्हतें. कुलाबा, सुवर्णदुर्ग, सिंधुदुर्ग अशीं अनेक ठिकाणें त्यानीं उभारलीं होतीं. तथापि, पोर्तुगीझ प्रबळ होते आणि त्यांचा उपद्रवहि जबर होता. त्यांच्यावर जरब बसवायची तर गोव्याच्या शेजारीं असलेल्या फोंड्यावर आपली अधिसत्ता स्थापणें जरूर होतें. फोंड्यावर स्वारी करण्याच्या वेळीं बहादूरशहाला मोकळा ठेवल्यास त्याचा उपद्रव असह्य झाला असता. म्हणून महाराजांनीं त्याच्याकडे तहाचें बोलणें लावलें. १७ किल्ले महाराजांनीं मोंगलांस द्यावे व बादशहानें संभाजीराजांना सहा हजारांची मनसब द्यावी या अटी ऐकतांच बहादूरशहा मनांतल्या मनांत उड्या मारूं लागला.

बहादूरशहाला तहाच्या वाटाघाटींत अडकवून महाराज फौजेसह राजापूरला दाखल झाले. वेंगुर्ल्याहून चाळीस गलबतें पुढें पाठवून आपण खुष्कीनें फोंड्यास आले. फोंडा सर करून तेथील बंदोबस्त पक्का केला आणि पुढें कारवारपर्यंतचा मुलुख काबीज केला. (१६७५) फोंडा सर होतांच तहाच्या वाटाघाटींचीहि गरज संपली. ‘ बहादूर-

खानाच्या कोणत्या पराक्रमाला भिऊन मी तह करूं ? ' असा रोकडा सवाल विचारून महाराजांनीं मोंगलांच्या वकिलास घालवून दिलें. बहादूरखान दिङ्मूढ झाला !

★

## दक्षिण दिग्विजयाचे शुभशकून

यानंतर महाराजांनीं साताऱ्चा किल्ला विजापूरकरांकडून घेतला. तेथेंच ते आजारी पडले. या आजारांतून उठल्यावर कर्नाटकच्या स्वारीचे विचार त्यांच्या मनांत विशेष घोळूं लागले.

इतक्यांत त्यांना एक शुभशकून झाला. महाराजांचा सरनौवत नेताजी पालकर जयसिंगाच्या स्वारीच्या वेळीं भांडून १६६६ सालीं मोंगलांकडे गेला होता. पुढें तो बाटून मुसलमान झाला आणि महंमद कुलीखान या नांवानें मोंगली फौजेंत त्यानें बरेच पराक्रम केले. अफगाणिस्तानांतहि त्यानें तलवार गाजविली होती. आतां हा पक्का मुसलमान झाला असें समजून औरंगजेबानें यावेळीं त्याला दक्षिणेंत पाठविलें. पण दक्षिणेंत येतांच नेताजीला पूर्वीचें आयुष्य आठवलें. त्याचें स्वराज्य-प्रेम जागृत झालें. तो महाराजांना येऊन भेटला. प्रायश्चित्त घेऊन महंमद कुलीखानाचा पुन्हां नेताजी पालकर बनला; महाराजांचा सरदार झाला.

विजापूर दरबारीं यावेळीं अत्यंत अंदाधुंदी माजली होती. या संधीचा फायदा घेऊन कर्नाटकवर स्वारी करून दक्षिण दिग्विजय करावा असें महाराजांनीं ठरविलें. गोवळकोंड्यांस कुतुबशाही राज्य होतें. पण तेथील कारभार मादण्णापंत या वजीराच्या हातीं होता. या मादण्णा-पंताचें महाराजांशीं सूत होतें. विजापुरी अंमलाखालीं असलेला कर्नाटक आपल्या हातीं यावा असें कुतुबशहाला वाटत होतें. तर

७१

कर्नाटक मुसलमानी सत्तेतून मुक्त होऊन हिंदूराज्यांत यावा असें मादण्णाच्या मनांत होतें. मादण्णापंतानें महाराजांकडे संधान बांधून कर्नाटक जिंकण्यासाठीं कुतुबशहाशीं त्यांचा मिलाफ करण्याचें ठरविलें.

याचवेळीं आणखी एक योग जुळून आला. महाराजांचे सावत्र भाऊ एकोजी राजे यांनीं तंजावर आपल्या ताब्यांत आणून शहाजी-राजांच्या जहागिरीला विस्तीर्ण स्वरूप आणलें होतें. एकोजी राजाकडे शौर्य होतें, शहाणपणा होता, पण ध्येयवाद नव्हता. ते स्वतःला विजापूरकरांचे चाकर म्हणवून घेण्यांत भूषण मानीत. एकोजी राजांच्या पदरीं रघुनाथ हणमंते हे एक जुने कारभारी शहाजी राजां-पासून होते. एकोजी लहान असतां या रघुनाथपंतांनींच तेथील कारभार हांकला होता. यावेळीं एकोजीराजे आणि रघुनाथपंत यांचा बेबनाव होऊन रघुनाथपंत महाराजांकडे आला. त्यानें महाराजांस एकोजीकडे वडिलांच्या वतनाचा वांटा मागा अशी भर देऊन कर्नाटकच्या स्वारीस प्रोत्साहन दिलें.

★

## भागानगरांत राजकारण

असे एक एक योग जुळून येतांच महाराजांनीं दक्षिण दिग्विजयाचा मुहूर्त नक्की केला. कुतुबशहाकडे संधान जुळून येत होतें. तिकडे रघुनाथ हणमंते, प्रल्हाद निराजी वगैरे पाठवून दिले. त्यांच्याकडून कुतुबशहाच्या प्रत्यक्ष भेटीचा बेत पक्का होतांच १६७७ जानेवारीमध्यें रायगडाहून सुमुहूर्तावर बाहेर पडले आणि निवडक पंचवीस हजार फौज, प्रमुख सरदार यांचेसह राजापूर वेंगुर्ल्यावरून हैद्राबादेस म्हणजे भागानगरास आले.

‘भागानगरची विलायत लागल्यावर ताकीद केली कीं, एक काडी रयतेची तसनस न व्हावी, ऐसें केलें. कित्येक गर्दना मारून जावता बसविला.’

महाराज हैद्राबादेंत आले तेव्हां "पातशहास खबर कळोन बहूत संतुष्ट जाहला. पातशहा पुढें दोन चार गांव सामोरे यावें असें केलें. पण राजा मोठा साधक, आण घालून पातशहास सांगून पाठविलें कीं, 'तुम्ही न येणें, आपण वडील भाऊ, मी धाकटा भाऊ...' मग पातशहा संतुष्ट झाले. मादण्णापंत...राजियास घेऊन शहरास गेले. पातशहांनीं कुलनगर शृंगारिलें. चौफेर बिदीस कुंकुम केशराचे सडे रंगमाळा घातल्या. गुढिया तोरणें पताका निशाणें नगरांत लाविलीं. नगर नागरिक लोक कोट्यान कोटी राजा पहावयास उभे राहिले. नारीनीं मंगळ आरत्या अगणित उजळून राजियास वंदिलें. सोनें रुपियाचीं फुलें राजियावरी उधळलीं.'

अशा तऱ्हेनें मिरवत मिरवत महाराज दाद महालांत कुतुबशहाच्या भेटीस गेले.

महाराज म्हणतात:—

'पातशहा तिकडून आले; आम्ही इकडून गेलों. पादशहांनीं बहुतच इज्जती होऊन, गळ्याला गळा लावून भेटले. आम्हास हातीं धरून नेऊन जवळी बैसविलें...कुतुबशहाचा व आपला घटीं बरेपणा करून घेतला.'

महाराजांचे पराक्रम त्यांच्या तोंडून ऐकण्याची पातशहानें इच्छा व्यक्त केली. महाराजांनीं आपलें अद्भूत चरित्र त्याला कथन केलें. भेटी संपली. 'पातशहाच्या स्त्रिया झरोकियांतून राजा पाहून बहुत थक्क जहाल्या!' 'राजे उठोन गेलियावरी पातशहाचें समाधान झालें कीं, राजा प्रामाणिक, आपणास रक्षिलें'!

'दुसरे दिवशीं मादण्णापंतांनीं राजियास आपले घरीं मेहमानीस नेलें. आणि आपले मातुश्रीचे हातीं पाकसिद्ध करून मादण्णापंत व आकण्णापंत जवळ बसून राजियास भोजन घातलें.'

तिसरे दिवशीं कुतुबशहानें महाराजांस मेजवानी दिली. यावेळीं महाराजांनीं कुतुबशहाच्या हत्तीचें कौतुक केलें. शहानें विचारलें, 'पण तुमच्याकडे कुठें हत्ती आहेत ?' महाराज मावळ्यांकडे दृष्टिक्षेप करून म्हणाले, 'हे इतके हत्ती माझ्यापाशीं आहेत !' 'हत्तीशीं झुंज घेतील ?' 'सहज !' महाराज उत्तरले.

दुसऱ्या दिवशीं मैदान माणसांनीं फुलून गेलें. एक मस्त हत्ती रंगणांत सोडण्यांत आला. कुतुबशहानें महाराजांकडे पाहिलें. महाराजांनीं येसाजीला खूण केली. तावडतोब येसाजी कंक त्या मस्त हत्तीवर चालून गेला आणि तरवारीच्या एका फटक्यांत त्यानें त्याची सोंड उतरविली. हत्ती चींचीं करीत पळून गेला आणि कुतुबशहाचा अभिमानसुद्धां.

भेटीचा मुख्य उद्देश पातशहाची मदत मिळविणें हा होता. महाराजांनीं त्याला भारून टाकलें होतें. त्यामुळें करार सहज झाला. फौजेच्या खर्चासाठीं महाराजांस दररोज तीन हजार होन द्यावे; पांच हजार फौज व तोफखाना त्यांच्या मदतीस द्यावा; सालिना एक लाख खंडणी महाराजांस द्यावी. कर्नाटक जिंकून शहास द्यावी असा करार झाला.

★

## श्री शैल्य क्षेत्रीं वैराग्य

हैद्राबादेंतील कार्यभाग झाल्यावर महाराज दक्षिणेस निघाले. कर्नूल शहरांतून पांच लक्ष खंडणी घेऊन ते कृष्णा–तुंगभद्रेच्या निवृत्तिसंगमावर गेले. तेथें व पुढें चक्रतीर्थांत त्यांनीं धार्मिक विधि केले. 'तेथून अनंतपुरीं कुल लष्कर ठेवून गायमुखापासून पर्वत वेंघावा भीमकुंड उतरचढ मिळोन तीन कोस दों दिवसां श्री शैल्यास राजे गेले. श्री शैल्य हें द्वादश ज्योतिर्लिंगांपैकीं एक स्थान. या

ठिकाणीं मल्लिकार्जुनाचें मंदीर आहे. महाराजांनीं 'नीळागंगेचें स्नान करून श्रीचें दर्शन घेतलें. तीर्थविधी जाला. राजियांनीं स्थळ देखोन परम आनंद जाला कीं, केवळ कैलास दुसरें, असें स्थळ वाटलें. तेथें हा देह श्रीस अर्पण करावा, शिरकमल वहावें ऐसें योजिलें.' पण जवळच्या मंडळींनीं नानाप्रकारें धर्मशास्त्राचे युक्तिवाद करून त्यांना नवव्या दिवशीं सावध केलें.

श्री शैल्याहून महाराज निघाले ते तिरुपति बालाजीचें दर्शन घेऊन कांजीवरम् मार्गानें जिंजीस आले. त्यांच्या पांच हजार स्वारांनीं जिंजीचा किल्ला किल्लेदाराला वश करून मिळविलाच होता. महाराजांनीं तेथील बंदोबस्त केला आणि ते वेलोर किल्ल्यावर चालून गेले. हा किल्ला लवकर हातीं येण्याचें चिन्ह दिसेना तेव्हां वेढ्याचें काम एका सरदारावर सोंपवून महाराज शेरखान लोदीच्या मागें निघाले. तिरुवादी येथें त्याच्या फौजचा निःपात करून महाराजांनीं त्याला शरण आणलें. वेलोरचा किल्ला पुढें चौदा महिन्यांत काबीज झाला.

★

## एकोजी राजे पळाले

आतां एकोजी राजांच्या भेटीचें काम राहिलें होतें. महाराज तिरुमलवाडीला आले. येथून त्यांनीं मदुरेच्या थोरकनाथाकडून सहा लाख होन खंडणी वसूल केली. एकोजीराजांना पत्र गेल्यामुळें ते भेटीस आले. एक आठवडा मुक्काम होता. पण महाराज आणि एकोजी यांचा मिलाफ झाला नाहीं. 'परस्परें कीत पडोन येकोजी राजे न पुसतां पळोन तंजावरास गेले.'

महाराजांना एकोजी राजाची दौलत हवी होती असें नाहीं. पण मुसलमान बादशहाच्या तंत्रानें त्यानें वागूं नये; आपल्याला अनुकूल

असावें असें त्यांना जरूर वाटत होतें. मुसलमान सल्लागारांच्या शिकवणीनें त्यानें महाराजांशीं उघड शत्रुत्व करण्यास सुरवात केली.

महाराजांना महाराष्ट्रांत परतण्याची घाई होती. शिवाय जातीनें एकोजी राजाशीं लढणें त्यांना प्रशस्त वाटत नव्हतें. त्यामुळें एकोजीचें प्रकरण वहीरजी हंबीरराव मोहिते याच्याकडे सोंपवून महाराज महाराष्ट्रांत आले.

★

## विजापुरी चाकर न हो

महाराज निघून गेल्यामुळें एकोजी राजांना स्फुरण चढलें. त्यांच्या मुसलमान सल्लागारांनीं त्यांना चिथवलें. त्यामुळें अखेर 'येकोजी राजे हंबीररावांवर चालून आले. झगडा झाला. एकोजीची तीन हजार घोडीं व हत्तीं पाडाव केले. मग कोलार कोट एकोजींनीं देऊन सला केला.' अशा तऱ्हेनें महाराजांच्या सरदाराच्या हातून एकोजी राजांनीं आपला पराभव ओढून घेतला.

महाराजांना हें कळतांच एकोजीराजांना वळविण्याची ही संधी त्यांनीं साधली. आपला वांटा देण्याबद्दल त्यांनीं एकोजीराजांवर दडपण आणलेंच, पण आपल्या उद्योगाचें वैशिष्ठ्यहि त्यांनीं मोठ्या कुशलतेनें त्याच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला.

एकोजीराजांना त्यांच्या वर्तणुकीची आठवण करून देऊन महाराज म्हणतात 'तरी ऐसा विचार करावा होता, कीं अधर्में करून तेरा वर्षें आपण सारें राज्य खादलें तें खादलें; आतां अर्धा वांटा मागतात तो त्यांचा त्यांस द्यावा, आणि आपण सुखी रहावें ऐसा विचार करावा होता. दुसरा विचार करावा होता, कीं श्री देवाची व श्रीची कृपा त्यांवरी पूर्ण झाली आहे. दुष्ट तुरुकांला ते मारितात. आपल्या

सैन्यांत तुरुक लोकच असतां जय कैसा होतो आणि तुरक लोक कैसे वांचूं पाहतात हा विचार करावा होता; आणि युद्धाचा प्रसंग पाडावा नव्हता ?'

आपल्याशीं संधी केल्यास 'तुम्हाला तुंगभद्रे अल्याड पन्हाळे प्रांतें तीन लक्ष होनांची दौलत देऊं' किंवा तेवढीच दौलत कुतुबशहा-कडून देववूं असें अभिवचन महाराजांनीं एकोजीराजाला दिलें.

आतां नाकच दाबलें गेल्यामुळें हळूहळू तोंड उघडलें. पण त्यांतहि एकोजी राजाची पत्नी दीपाबाई हिचा समंजसपणाच अधिक. तिनें रघुनाथपंताला बोलावून महाराज आणि एकोजी यांचे वांटे करविले.

लगेच महाराजांनीं लिहिलें, 'आमची भावजई शहाणी...उत्तम झालें. आम्हांस विभाग घेऊन तरी काय कर्तव्य? त्यांज करितांच संपादन करणें. जनरीति म्हणून बोलणें आलें.'

या एकोजी प्रकरणांत महाराजांचा हेतू काय होता हें त्यांनीं त्याला पाठविलेल्या १९ कलमी पत्रावरून स्पष्ट दिसतें. दुष्ट, हिंदुद्वेषी यांस आपले राज्यांत ठेवूं नये; विजापूरकरांना पांच हजार फौजेपर्यंत मदत करावी; चाकरी करणें असें समजूं नये, असें त्यांनीं स्पष्ट बजावलें आहे.

'बेंगरूळ, होसकोट व सिलेकोट हे दोन लाखांचे प्रांत आम्ही जिंकले असून ते पांच लाखापर्यंत उत्पन्नास येतील. ते आम्ही चिरंजीव दीपाबाई एकोजीचें कुटुंब यांस चोळीबांगडीसाठीं दिले आहेत...चंदी-नजीकचा आम्ही सोडविलेला सात लाख होनांचा मुलूख एकोजीराजे यांस दूधभाताकरितां म्हणून वंशपरंपरा देण्यांत येत आहे.'

महाराजांनीं एवढें केलें तरी त्याचा उमज एकोजीराजांना पडला नाहीं. आपलें स्वातंत्र्य हरपलें अशा भावनेनें ते उदास राहूं लागले. महाराजांना हें समजतांच त्यांनीं एकोजीराजांना पुन्हां लिहिलें, 'आम्ही तुम्हास वडील मस्तकीं असतां चिंता कोणे गोष्टीची आहे?

...तुम्ही त्या प्रांतें पुरुषार्थ करून संतोषरूप असलिया, आम्हांस समाधान व श्लाघ्य आहे कीं कनिष्ट बंधु असे पुरुषार्थी आहेत.... कार्यप्रयोजनाचे दिवस हे आहेती. वैराग्य उत्तर वयीं कराल तें थोडें. आज उद्योग करून आम्हांसहि तमासे दाखविणें.'

★



# स्वराज्याची चिंता

दक्षिण दिग्वजय आटोपून महाराज महाराष्ट्रांत आले. येतांना वाटेंत त्यांनीं जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावली. एकोजीचें प्रकरण अपुरें राहिलें होतें तें महाराष्ट्रांत राहून पुरें करीत असतांनाच महाराजांना संभाजीराजांनीं पेंचांत आणलें.

दक्षिण दिग्विजयाला निघण्यापूर्वींच संभाजीराजांच्या अविवेकी आणि लहरी स्वभावाचा अनुभव महाराजांना आला होता. त्याला सुधारण्याचे महाराजांचे प्रयत्न अपेशी ठरत होते. त्यांनीं संभाजी राजाला पन्हाळा किल्ल्यावर बंदोबस्तांत ठेवलें. पण यामुळें संभाजी राजे आणखी भडकले. महाराजांच्या ध्येयवादाची आणि आपल्यावरील जबाबदारीची या राजपुत्राला कांहींच कल्पना नव्हती. महाराजांची खोड मोडण्यासाठीं ते पन्हाळयावरून निसटून मोंगल सेनापति दिलीरखानास जाऊन मिळाले.

महाराजांवर निराशा कोसळली. उदासीनता त्यांना ग्रासूं लागली. पण महाराज विचलित झाले नाहींत. संभाजीराजांनीं दिलीरखानाला घेऊन सातार्‍याजवळच्या भूपाळगडावर मुद्दाम हल्ला केला. संभाजी-राजांना पाहून किल्लेदार फिरंगोजी नरसाळा यानें तोफखाना थांबविला आणि गड पडला. महाराजांस हें समजतांच त्यांनीं फिरंगोजीला दोष दिला.

क्रूर कत्तली आणि लुटालूट करीत संभाजी राजासह दिलीरखान विजापुरावर निघाला. विजापूरकर महाराजांस शरण आले. महाराजांनीं दक्षिणेंत जिंकून घेतलेल्या मुलखावरील आपला अंमल विजापूर-करांकडून मान्य करून घेऊन विजापूरच्या रक्षणासाठीं सर्व तर्‍हेची मदत पाठविली.

दिलीरखानाला शह देण्यासाठीं महाराजांनीं मोंगल मुलुखावर स्वारी केली. जालनापुरावर धडक मारून तें लुटलें. या वेळीं शहरांतील धनिक आपली संपत्ति घेऊन सैदजान महंमद या साधूच्या मठांत लपून बसले. महाराजांनीं त्यांचा तेथेंहि पिच्छा पुरविला. यामुळें रागावून साधूनें महाराजांना शाप दिला. जालनापुरची लूट रायगडा-पर्यंत सुरक्षित आली नाहीं. वाटेंत मोंगलांनीं महाराजांच्या सैन्याचा फार नाश केला.

जालनापूरची मोहीम फसली तरी विजापूरची मदत यशस्वी झाली. दिलीरखान व संभाजीराजे यांना निरुपायानें विजापूरचा वेढा उठवावा लागला. त्यामुळें चिडून संभाजीराजाच्या सल्ल्या-प्रमाणें दिलीरखान पन्हाळ्याकडे निघाला. पण वाटेंत त्यानें हिंदू प्रजेवर जुलूम केल्यामुळें त्याचें व संभाजीराजांचें वांकडे आलें.

महाराज मोंगलांविरुद्ध विजापूरकरांना मदत करतात हें पाहून शहाजादा मुअज्जम याला एक युक्ति सुचली. दक्षिणेंत महाराज त्याचा सारखा पराभव करतात म्हणून औरंगजेब मुअज्जमला सारखा टोंचून

बोलत असे. तेव्हां युक्तीनें महाराजांना पकडून अपमानाचा सूड घेण्याचा विचार तो करीत होता.

बादशहाविरुद्ध आपण बंड पुकारल्याचें सोंग करावें आणि महाराजांची मदत मागावी असें त्यानें ठरविलें. महाराज मदत देतांना हातीं सांपडले कीं त्यांना गिरफदार करायचें असा हा डाव सिद्ध झाला. महाराजांशीं बोलणीं सुरू झालीं.

पण महाराज मुअज्जमच्या कल्पनेपेक्षां कितीतरी चाणाक्ष होते. त्याच्या दुष्ट बेतांची माहिती त्यांनीं अगोदरच मिळविली होती. त्यांनीं मुअज्जमला चकित करण्याचें ठरविलें.

मुअज्जम एक दिवस शिकारीहून परत येत असतांना रस्त्यांत त्याला एक शेतकरी भेटला. शेतकऱ्यानें शहाजाद्याला सलाम केला. आणि दुधाची चरवी दिली. शहाजाद्याला तहान लागलेली होती. त्यानें दूध पिऊन टाकलें. त्या चरवीच्या तळाला, लिहिलेलें होतें कीं, 'मी शिवाजी आहें; तुझें आणखी कांहीं काम असेल तर सांग'. मुअज्जमनें चमकून वर पाहिलें. शिवाजी महाराज तेथून कधींच नाहींसे झाले होते. खजील होऊन मुअज्जमनें महाराजांना फसविण्याचा नाद सोडला.

दिलीरखानाला कांहींच साधत नाहीं तर त्याच्या हातीं असलेल्या संभाजीला तरी पकडावें असें ठरवून औरंगजेबानें तसा हुकूम दिलीरखानाला पाठविला. या हुकुमाची कुणकुण लागतांच संभाजी राजे विजापुरास निसटून गेले. संभाजीराजांना परत आणण्यासाठीं महाराजांचे प्रयत्नहि चालू होतेच. विजापुरानजिक असलेल्या महाराजांच्या लोकांसमावेत संभाजी राजे पुन्हा पन्हाळ्यावर आले.

तावडतोब महाराज पन्हाळगडावर आले. त्यांनीं संभाजी राजाला अनेक प्रकारें बोध केला. परंतु त्यांच्या मनामध्यें बदल झाल्याचें चिन्ह दिसेना. महाराज उदास झाले. स्वराज्याची भवितव्यता त्यांच्या नजरेसमोर येऊं लागली. त्यांच्या अन्तःकरणाची

कालवाकालव होऊं लागली. संभाजी राजा ज्येष्ठ पुत्र. पण त्याची ही स्थिति. त्याला दूर करून राजारामाला अधिकार द्यावे तर तो अगदींच लहान. शिवाय त्याची माता राणी सोयराबाई हिच्या कारस्थानी स्वभावानें महाराज आधींच उद्विग्न झाले होते. अष्ट-प्रधानांत मोरोपंत पिंगळे आणि अण्णाजी दत्तो यांचें वैर परमावधीला पोंचलेलें. महाराजांना कांहीं सुचेना. त्यांनीं संभाजीला पुन्हां स्वराज्याच्या व्यापाची कल्पना दिली. रायगडास जाऊन राजारामाचें लग्न करतों. ‘ मग राज्यभाराचा विचार कर्तव्य तो करूं. तुम्ही वडील पुत्र, सर्व प्रकारें भरंवसा तुमचा ’ असें बोलून महाराज निघाले.

★

## ह्या तो मृत्युलोकच आहे


गेल्या कांहीं वर्षांत महाराजांना समर्थ रामदासस्वामींचा सहवास लाभला होता. उद्विग्न मनाला शांतता प्राप्त करून देण्यासाठीं महाराज पन्हाळगडावरून सज्जनगडास आले. निरिच्छ आणि निःसंग स्वामींच्या सहवासांत अध्यात्म श्रवण करून महाराज संतोप पावले. ‘ तीन दिवस समाधि लागोन राजेश्री बसले होते. ’

रायगडास गेल्यावर महाराजांनीं राजारामांची मुंज केली. प्रतापराव गुजर याच्या कन्येशीं त्याचा विवाह करून दिला. आणि आठच दिवसांनीं महाराज मृत्युशय्येवर पडले.



: श्रीसमर्थ रामदास :

महाराजांस 'ज्वराची व्यथा जाहली. आयुष्याची मर्यादा झाली असें कळून जवळील कारकून व हुजरे लोक होते त्यामध्यें सभ्य, भले लोक बोलावून आणिले...सर्वांचे कंठ दाटून नेत्रांपासून उदक स्रवूं लागलें. त्या उपरि राजे बोलले, कीं तुम्ही चुकूर होऊं नका. हा तो मृत्युलोकच आहे...आतां अवघे बाहेर बैसा. आपण श्रीचें स्मरण करतों. म्हणोन अवघियांस बाहेर बसविलें. आणि राजियांनीं श्री भागिरथीचें उदक आणवून स्नान केलें. भस्म धारण करून रुद्राक्ष धारण केले. आणि योगाभ्यास करून, आत्मा ब्रह्मांडास नेऊन, दशद्वारें फोडून प्राण प्रयाण केलें.' चैत्र शुद्ध पौर्णिमा शके १६०२. २३ मार्च १६८०




: महाराजांची समाधि :

महाराजांचा देह पडला. महाराष्ट्राचा भाग्यविधाता अदृश्य झाला. दिल्लींत औरंगजेबानें समाधानाचा सुस्कारा टाकला. पण त्याला कळलें नाहीं कीं,

मूरतसे कीरत बडी बिनपंख उड जाय।
मूरत तो जाती रही पण कीरत कभू न जाय॥

महाराज गेले तरी त्यांची कीर्ति दुमदुमत होती. त्या कीर्ति-स्फूर्तीनें मराठी राष्ट्रानें वीस वर्षं औरंगजेबाशीं सामना दिला आणि अखेर त्याला अहमदनगरला मातींत मिळवलें.

★



५

# व्यक्तिमत्वाचे पैलू

शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा प्रताप
शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं

श्री शिवाजी महाराजांचें चरित्र हें एकाद्या रोमहर्षक कादंबरीपेक्षांहि अद्भुत आहे. त्यांनीं महाराष्ट्राला स्वातंत्र्य दिलें आणि भारताची लाज राखली. मुसलमानांच्या जुलमी अमलांतून त्यांना सगळाच भारत मुक्त करावयाचा होता. त्यासाठीं त्यांनीं दक्षिण दिग्विजय केला. पण उत्तर दिग्विजय करून 'पातशाही पुरातन हिंदूंची आहे' हें कृतीनें सिद्ध करण्यास त्यांना अवकाश मिळाला नाहीं.

तथापि, महाराष्ट्रांत त्यांनीं केलेलें कार्य इतकें थोर होतें, इतकें उज्ज्वल होतें कीं त्यापासून उत्तरेंतील वीरांनीं स्फूर्ति घेतली. त्यांनीं बादशाही खिळखिळी केली. म्हणूनच महाराष्ट्रांत स्वराज्य स्थापन होतांच समर्थ रामदासांनीं धन्योद्गार काढले:—

'बुडाला औरंग्या पाणी । म्लेंच्छ संहार जाहला
मोडिली मांडिली क्षेत्रें । आनंदवन भुवनीं'

महाराजांच्या मृत्यूनंतर, आतां मराठी राज्याचा चक्काचूर करतों असें औरंगजेबाला वाटलें. संभाजीला पकडून नेऊन, त्याचे हाल हाल करून ठार मारल्यावर औरंगजेब स्वराज्यांत आला. पण शिवाजी महाराजांनीं मराठी राज्याचें मंदीर वाळूवर उभारलें नव्हतें. राष्ट्रनिष्ठेच्या भक्कम पायावर तें बांधलेलें होतें. तें कोसळण्यासाठीं औरंगजेबानें त्याच्यावर टक्कर दिली आणि त्याचाच कपाळमोक्ष झाला ! महाराजांनीं स्थापन केलेलें राज्य कायमच राहिलें; वाढत गेलें. दिल्लीची बादशाही मात्र कोसळत गेली. हा शिवचरित्राचा प्रताप आहे.

शिवाजी महाराजांचें वर्णन इंग्रज लोकांनीं लिहून ठेवलें आहे, त्यावरून त्या राजबिंड्या पुरुषाच्या व्यक्तित्वाची कल्पना येते. गव्हाळ रंगाची ती ठेंगणी ठुसकी मूर्ति आपल्या तेजस्वी आणि भेदक नजरेनें इतरांवर आपली तत्काल छाप बसवीत असे. मंदस्मित करीत बोलण्याची त्यांची पद्धत असे. तीक्ष्ण बुद्धीच्या आणि अचूक निर्णयशक्तीच्या प्रभावानें त्यांचें वक्तृत्व त्यांच्या कर्तृत्वाइतकेंच परिणामकारक होत असे.

महाराज प्रजेचे राजे होते; सैन्याचे नायक होते. महाराष्ट्रधर्म वाढविण्यासाठीं मराठा तितुका मेळविण्याचें व्रत त्यांनीं घेतलें होतें. हें मोठें खडतर व्रत होतें. कारण ‘ कोणी पुसेना कोणाला ’ अशी मराठ्यांची अनवस्था होती. त्यावेळीं त्यांचें संघटन करून स्वराज्य निर्माण करावयाचें होतें. त्यांची स्वतःची वागणुकच आदर्श होती म्हणून हें शक्य झालें. ते सैनिकासारखेच रहात. नेहमीसुद्धां एक वेळचें जेवण त्यांना पुरत असे. सैनिकांच्या बरोबरीनें ते कष्ट सोशीत. नेहमीं त्यांच्या आघाडीवर रहात. त्यांच्याबद्दल दुरावा असा साध्या सैनिकालाहि वाटत नसे. त्यांचा पोषाखहि असाच साधा असे.

त्यांची शिस्त कडक होती. पण स्वतः महाराजच तिचें पालन करीत असल्यामुळें इतरांनाहि ती पाळायला लावणें त्यांना शक्य झालें.

★

## समर्थांचा सिद्ध शिष्योत्तम

उच्च ध्येय आणि त्यासाठीं शिस्तबद्ध अविरत प्रयत्न करण्याची स्फूर्ति महाराजांना कोणी दिली? ज्या महान् कर्मयोग्यानें राष्ट्र-निर्मितीचें ध्येय प्रत्यक्षांत आणलें त्याची प्रतिभा तें ध्येय पाहाण्याइतकी स्वयंसिद्ध होती यावद्दल शंका घेण्याचें कारण नाहीं.

समर्थ रामदासस्वामी महाराजांचे सद्गुरु होते. अर्थात् यामुळें स्वराज्य संकल्पहि त्यांनींच महाराजांना सांगितला असें मानण्याचें कारण नाहीं. ते त्यांचे पारमार्थिक गुरू होते. १६७२ सालीं महाराजांनीं त्यांची प्रत्यक्ष भेट घेतली आणि गुरुपदेश घेतला. महाराजांची धर्मबुद्धि प्रखर होती. त्यांना परमार्थाची आस निरंतर लागलेली असे.

समर्थ हे एक महान् निस्पृह साधू होते. गिरीकंदरांत राहून आत्म-चिंतन करावें तसेंच समाजांत जागृति करावी, सांप्रतच्या अधोगतीची जाणीव देऊन त्याच्यामध्यें स्वाभिमान उत्पन्न करावा असा त्यांचा उद्योग होता. धर्मावर मुसलमानी राजसत्तेचें आक्रमण पाहून ते अस्वस्थ झाले होते.

याच वेळीं शिवाजी राजांचा स्वराज्यस्थापनेचा उद्योग चाललेला होता. समाजांत होणाऱ्या घडामोडींवर समर्थांचें बारीक लक्ष असल्या-मुळें त्यांच्या नजरेंतून हा उद्योग सुटला नाहीं. शिवाजी महाराजांचा एक एक उद्योग सफळ होऊं लागतांच समर्थांनाहि कृतकृत्य, वाटूं

लागलें. पारघाटांत भवानीची स्थापना होतांच 'तुझा तूं वाढवीं राजा। शीघ्र आम्हांचि देखतां' असे सहजोद्गार त्यांच्या तोंडून निघाले.

निश्चयाचा महामेरु। बहुत जनांसी आधारू
अखंड स्थितीचा निर्धारु। श्रीमंत योगी॥
परोपकाराचिया राशी। उदंड घडती जयासी
तयाचे गुण महत्वासी। तुळणा कैंची॥

शिवराजांचें कार्य डोळे भरून पाहिल्यावर समर्थांनीं समाधानाचे उद्‌गार काढले कीं—

उदंड जाहलें पाणी। स्नान संध्या करावया॥

परमार्थसाधक समर्थांना लोककल्याणाचा ध्यास होता आणि स्वराज्यसंस्थापक महाराजांना परमार्थाची ओढ होती. म्हणून ते गुरु-शिष्य झाले.

पण स्वराज्याचें, राष्ट्र निर्मितीचें ध्येय महाराजांनीं आपल्या प्रतिभेनेंच पाहिलें होतें. शिवरायाचें कार्य ही शहाजी राजाची अतृप्त आकांक्षा असेल, शहाजीचे आशीर्वादहि त्यांना असतील; अफझलखानाच्या वधानंतर शहाजीराजांनीं आपल्या पुत्राच्या मदतीसाठीं विजापूरकडे आपल्या सैन्याचा मोर्चा वळविला होता, पण शहाजीराजांकडून महाराजांना मार्गदर्शन झालें नाहीं; त्यांची तशी अपेक्षाहि नव्हती.

★

## स्फूर्तिदेवता जिजामाता

महाराजांची स्फूर्तिदेवता म्हणून जिजाबाईचा मात्र उल्लेख करतां येईल. मुसलमानी सत्तेनें समाजांत जो विध्वंस मांडला होता त्याचें दर्शन जिजाबाईला तिच्या संसारांतच उमटलेलें दिसत होतें. प्रथम

ती आईबापांना दुरावली, बापाचें आणि नवऱ्याचें वैर आलें, बापाचा सुलतानानें खून केला, बादशाहीसाठीं रक्ताचें पाणी करणाऱ्या नवऱ्याला वनवासच भोगावा लागत होता हें तिनें प्रत्यक्ष पाहिलें आणि अनुभवलें.

शहाजी राजांनीं तिला टाकल्यावर शिवाजी हाच तिच्या जीवनाचा आधार होता. त्याच्या कर्तृत्वानें तिची महत्त्वाकांक्षा जागृत झाली आणि त्या महत्त्वाकांक्षेनें महाराजांचें ध्येय उजळलें. महाराजांच्या मनावर तिनें धार्मिक संस्कार केले, राजकीय उद्योगांना प्रोत्साहन दिलें. ती त्यांची प्रमुख सल्लागार बनली.

महाराजांनीं जीं अनेक साहसें केलीं तीं करतांना जिजाबाईचा वरदहस्त त्यांच्या मस्तकावर असला पाहिजे यांत शंका नाहीं. अफजुलखानाशीं त्यांनीं घेतलेली भेट ही प्रत्यक्ष काळाची भेट होती. आपल्या पुत्राला एवढ्या साहसांत उडी घेण्यासाठीं आशिर्वाद देणारी माता धन्य होय. तिच्या आत्मविश्वासाला तोडच नाहीं.

पन्हाळ्यावर सिद्दी जोहाराच्या फौजेनें महाराज कोंडले गेले. वेढा उठविण्याचें काम नेताजीच्या हातून पार पडेना तेव्हां जिजाबाई म्हणाली, ' तुमच्या हातून वेढा उठविला जात नसेल तर मीच त्या कामाला लागतें ! '

महाराज औरंगजेबाच्या भेटीसाठीं आग्र्याला गेले तो प्रसंग असाच खडतर होता. ती जिजाबाईचीच एक कसोटी होती. महाराज आग्र्याला गेले, तेथें बंदींत पडले. पण शिवाजी परत रायगडीं येईपर्यंत पुत्राची चिंता आणि राज्याची जबाबदारी जिजाबाईनें सारख्याच धैर्यानें सहन केली.

शेवटीं महाराजांना राज्याभिषेक झाल्यानंतर बरोबर तेराव्या दिवशीं ही राजमाता आपल्या डोळ्यांचें पारणें फेडून स्वर्गवासी

झाली. महाराजांना तेव्हांपासून उदास वाटूं लागलें. महाराजांची प्रतिभा जन्मसिद्ध असली तरी जिजाबाईनें केलेल्या पवित्र संस्कारांनीं ती लखलखीत झाली; तिला एक तऱ्हेचें मांगल्य आलें.

★

## धर्मनिष्ठेचा प्रदीप

महाराज धर्मनिष्ठ होते; त्यांच्या स्वराज्यस्थापनेचा स्वधर्मरक्षण हा एक प्रमुख हेतू होता. या धार्मिकतेमुळें ते साधुसंतांचे पूजक होते. गोपाळभट महाबळेश्वरकरांकडून त्यांनीं मंत्रोपदेश घेतला. रामदासांना तर त्यांनीं पुढें गुरूच मानलें. राजकारण आणि संतसेवा यांच्यामधील मौजेचा संबंधहि त्यांच्याबाबतींत जोडतां येतो. कारण महाराज ज्या भागांत जात त्या ठिकाणच्या साधुसंतांचे आशीर्वाद प्रथम ग्रहण करीत. जनमनावर याचा अनुकूल परिणाम होत असला पाहिजे हें उघड आहे.

दक्षिण दिग्विजयाला जाण्यापूर्वीं त्यांनीं पाटगांवच्या मौनीबावांचा प्रसाद घेतला होता. जंजिऱ्याच्या शिद्दीवर हल्ला करण्यापूर्वीं केळशीच्या याकूत बाबाचा आशीर्वाद मिळविण्यासाठीं ते झटले.

मात्र याचा अर्थ त्यांची ही संतसेवा आणि ईशभक्ति राजकारणाचा एक भाग होता असें मानणें बरोबर ठरणार नाहीं. त्यांनीं प्रतापगडावर भवानीची स्थापना केली किंवा राज्याभिषेकापूर्वीं चिपळूणला जाऊन परशुरामाचें दर्शन घेतलें हें सहज वाटेल. पण औरंगजेबाचा ससेमिरा मागें लागलेला असतांना आग्र्याहून उड्डाण केल्यानंतर मथुरेपासून गयेपर्यंत अनेक यात्रा केल्या त्या करण्याची प्रबल इच्छा अतीव धार्मिक बुद्धीशिवाय झालीच नसती.

दक्षिण दिग्विजयांत श्री शैल्यक्षेत्रीं मल्लिकार्जुनासमोर ते गेले त्यावेळीं त्यांच्या चित्ताची इतकी तन्मयता झाली कीं शंकरापुढें आत्मसमर्पण करण्यास ते तयार झाले होते.

त्यांच्या अंगांत भवानी देवीचा संचार होत असे आणि त्यावेळीं पुढच्या कार्याचा संदेश देवी त्यांच्या मुखानें बोलत असे, असे उल्लेख बखरींत आहेत. या प्रकरणाची फोड करणें कठीण आहे. महाराज पातंजल योगशास्त्रांत निपूण असावे असा तर्क एका ठिकाणीं यासंबंधीं केलेला आहे. ईश्वराचा ध्यास लागल्यानंतर चित्ताच्या तल्लीन अवस्थेंत बुद्धीला होणारें तें स्फुरणहि कदाचित् असेल!

त्यांची धर्मनिष्ठा संकुचित नव्हती. धर्मभेदांना त्यांच्याकडे स्थान नव्हतें. औरंगजेब आणि मुसलमान बादशहा हिंदूंचा धार्मिक छळ करीत असतांना हिंदूधर्माचे संरक्षक म्हणून पुढें आलेले शिवछत्रपति आपल्या मुसलमानी धर्माचाहि गौरव करतात ही सामान्य गोष्ट नव्हे. त्यांच्या मनांत धार्मिक सूडाची कल्पना उत्पन्न झाली नाहीं याचें कारण त्यांना खऱ्या धर्माची ओळख झालेली होती.

शिव्याशापांचा वर्षाव करीत शिवछत्रपतींचा नामोच्चार करणारा मुस्लीम इतिहासकार खाफिखान म्हणतो:—'त्याचे (शिवाजीचे) सैनिक जेव्हां लुटीला निघत तेव्हां ते मुसलमानांना, कुराणाला, किंवा स्त्रियांना कांहींहि उपसर्ग देत नसत. कुराणाचें पुस्तक या लुटींत त्याच्या हातीं आलें तर त्याचा सन्मान करून तें तो मुसलमानांच्या हवालीं करीत असे.' महाराजांच्या परधर्मसहिष्णुतेला खाफिखाना-पेक्षां मोठा दुसरा साक्षिदारच नको.

महाराजांच्या सैन्यांत मुसलमान होते. त्यांच्या आरमारांत इब्राहिमखान आणि दौलतखान हे दोन मोठे मुसलमान नाविक अधिकारी होते. काझी हैदर नांवाचा एक मुसलमान त्यांचा चिटणीस होता. आपल्या न्यायीपणानें त्यांनीं मुस्लीम प्रजेचें प्रेम संपादन केलें होतें आणि प्रभावी व्यक्तित्वानें मुसलमान सेवकांची अविचल श्रद्धा मिळविली होती.

महाराज आग्र्याला गेले तेव्हां त्यांच्या बरोबर एक मुसलमान चपराशी मुलगा होता. तुरुंगांतून पलायन करण्याचा महाराजांचा बेत त्याला माहित होता. इतकेंच नव्हे तर तोहि त्यांत होता. महाराज पेटाऱ्यांतून बाहेर गेल्यावर हिरोजी फर्जंद त्यांचे जागीं अंथरुणांत निजला आणि हा मुलगा त्याचे पाय चेपीत बसला. पुढें औषध आणण्याच्या निमित्तानें हे दोघे बाहेर पडले. पण पुढें त्यांना पकडण्यांत आलें. मुलगा मुसलमान असल्यामुळें तो आपल्या काफीर धन्याचें गुपित फोडील, अशी बादशहाची अपेक्षा होती. त्या मुलाला फोडून काढण्यांत आलें. पण मरेपर्यंत त्यानें कांहीं सांगितलें नाहीं.

महाराजांची धर्मनिष्ठा किती जाज्वल्य होती आणि सुधारणेची दृष्टि किती व्यापक होती हें त्यांनीं केलेल्या शुद्धीच्या प्रयत्नांवरून दिसून येईल. हिंदुधर्माचे दरवाजे, परधर्मांत गेलेल्यांना पुन्हा आपल्या घरांत प्रवेश करण्यास बंद केले तर तो हिंदुधर्मावर आघात होईल हें त्यांनीं जाणलें. फलटणच्या बजाजी निंबाळकराला त्यांनीं हिंदुधर्माची पुन्हा दीक्षा दिली. इतकेंच नव्हे तर आपल्या मुलीचें त्यांनीं बजाजीच्या मुलाशीं लग्न करून दिलें. ही तत्त्वनिष्ठा खरोखरच जबर म्हटली पाहिजे. नेताजी पालकरालाहि त्यांनीं पुन्हा हिंदू करून घेतलें.

स्त्रियांच्या शीलाला महाराज अतिशय जपत असत. कोणत्याहि स्वारीमध्यें शिपायांनीं बायकांच्या केसालाहि धक्का लावतां कामा नये अशी त्यांची सक्त ताकीद असे. त्यामुळें अनेकदां शत्रूपक्षाचे लोक बायकांचा वेष घेऊन आपला जीव बचावीत. आपल्या विरुद्ध लढणाऱ्या रायबागिणीचा त्यांनीं सत्कार केला. दक्षिण दिग्विजयाहून परततांना बेलवडीच्या देसाईणीला वाईट तऱ्हेनें वागविल्याबद्दल त्यांनीं आपल्या एका अधिकाऱ्याचे डोळे काढून त्याला तुरुंगांत टाकलें होतें.

★

महाराज दूरदृष्टीचे मुत्सद्दी आणि निधड्या छातीचे वीर होते. त्यांचा आत्मविश्वास जबरदस्त होता. आणि त्यांच्या प्रत्येक कृत्यांत हे तीनहि गुण एकवटलेले दिसतात. जिंकण्यासाठीं नम्र होण्यास ते सदैव तयार असत. अफजुलखानाची भेट, पन्हाळ्यावर घेतलेली सिद्दी जोहाराची गांठ आणि खुद्द आग्र्याला जाऊन औरंगजेबाशीं घेतलेली मुलाखत हे त्यांच्या अतुल धैर्याचे प्रसंग आहेत.

आपण स्वतंत्र राज्य निर्माण करीत आहोंत; एका राष्ट्राचा पुनर्जन्म करीत आहोंत याची पूर्ण जाणीव त्यांना होती. त्यामुळें राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाकडे त्याच्या निर्मात्याचें जसें लक्ष असावें तसेंच त्यांचें होतें. त्यांनीं मराठी आरमार उभें केलें, कोट किल्ल्यांच्या रूपानें मराठी शिल्प आकारास आणलें. आपली राजमुद्रा ठोकली, आपल्या नांवाचें नाणें—होन—पाडला. राज्य-व्यवहार-कोषाची निर्मिति करविली.

त्यांनीं आनंदवनभूवन निर्माण केलें. पण मुसलमानी सत्ता उध्वस्त करून सबंध हिंदुस्थानांत हिंदवी स्वराज्य निर्माण करण्याची त्यांची आकांक्षा होती. त्यासाठीं तरुण छत्रसाल त्यांच्या नोकरीस राहाण्यास राजी असतां महाराजांनीं त्याला बुंदेलखंडांत स्वराज्य निर्माण करण्यास पाठवून दिलें.

राष्ट्रीय भावना आणि राष्ट्रासाठीं प्राण देण्याची ईर्षा हा राष्ट्राचा खरा पाया होय. महाराजांनीं हा पाया निर्माण केला. म्हणून त्यांच्या अकालीक निधनानंतर राष्ट्राच्या, स्वराज्याच्या संरक्षणासाठीं प्राण देण्यास लोक पुढें आले. शिवाजी महाराजांचें ऐतिहासिक श्रेष्ठत्व हेंच आहे. आणि स्वतंत्र भारताला त्यांची हीच स्फूर्ति आहे !

BVBK-0404520



१६७२ सालीं महाराजांनीं समर्थांची भेट घेतली आणि गुरुपदेश घेतला. (पृष्ठ ९०)

# आदर्श चरित्रें

| | | |
|---|---|---|
| भगवान रामचंद्र | धों. वि. सप्रे | मूल्य ८) |
| भगवान परशुराम | ,, | ,, ४ |
| भगवान श्रीकृष्ण | ,, | ,, ८ |
| देवर्षि नारदमुनि | बा. वा. फाटक | ,, ६ |
| वीर हनुमान | ,, | ,, ४ |
| दशमुखी रावण | ,, | ,, ४ |
| भक्त प्रल्हाद | शिवराम वाशीकर | ,, ४ |
| ध्रुवबाळ | ,, | ,, ४ |
| संत जनाबाई | ,, | ,, ४ |
| श्रीतुकाराम महाराज | व. दि. पालेकर | ,, ८ |
| कॅप्टन लक्ष्मी | ग. का. रायकर | ,, ४ |
| महात्मा गांधीजी | ,, | ,, ४ |
| देवी सरोजिनी | मधुकर गुर्जर | ,, ४ |
| साने गुरुजी | वैद्य रामभाऊ भोगे | ,, ६ |

याशिवाय उज्ज्वळणीचीं पुस्तकें, गोड गोड भावगीतें व धार्मिक पुस्तकें आमच्याकडे मिळतात. पत्र पाठवून यादी मागवावी.



: अजिंक्यतारा — सातारा :

जय हिंद प्रकाशन : झावबाची वाडी : मुंबई २